शास्त्रीय समाजवादाचे खुले ज्ञानपीठ
**समाजवादी प्रबोधिनीची**
**प्रबोधन प्रकाशन माला**
**वर्ष तिसरे : पुस्तक नववे**

# भारतातील बेरोजगारी आणि रोजगाराचा हक्क

**लेखक :**
**डॉ. डॉ. जे. एफ्. पाटील**
**डॉ. व्ही. बी. ककडे**

**प्रबोधन प्रकाशन**
शास्त्रीय समाजवादाचे खुले ज्ञानपीठ
समाजवादी प्रबोधिनी
५५६/१, इंडस्ट्रियल इस्टेट,
इचलकरंजी ४१६ ११५
फोन : (०२३२४) २२०८५

**मुद्रण खर्च : ७/- रुपये**
**पुनर्मुद्रणाचा मुक्त परवाना**

प्रकाशक : शांताराम गरूड, समाजवादी प्रबोधिनी इचलकरंजी
मुद्रण स्थळ : अंकुर ऑफसेट प्रिंटर्स, १०/११६७ हूलगेश्वरी रोड, इचलकरंजी. फोन २४६३१

शास्त्रीय समाजवादाचे खुले ज्ञानपीठ

समाजवादी प्रबोधिनीची प्रबोधन प्रकाशन माला

**वर्ष तिसरे १९९२**

# प्रकाशने

पुस्तक १ ले - **नव्या पारतंत्र्याचा सापळा**
डॉ. भारत पाटणकर, कॉ. कृष्णा खोपकर

पुस्तक २ रे - **पंजाबचा प्रश्न**- पत्रकार जगन फडणिस

पुस्तक ३ रे - **महाराष्ट्र विद्यापीठे विधेयक**
प्रा. ए. बी. पाटील, डॉ. जे. एफ. पाटील

पुस्तक ४ थे - **भारतातील बँकींग पध्दती नरसिंहम समितीचा अहवाल**
डॉ. वसंतराव जुगळे

पुस्तक ५ वे - **दुष्काळ आणि दुष्काळ निर्मूलनाचे लोकशास्त्रीय पर्याय**
पत्रकार जगन फडणिस, डॉ. भारत पाटणकर

पुस्तक ६ वे - **आपल्या नगरपालिका कशा आहेत? कशा असाव्यात?**
श्री. वा. मोडक, आमदार के. एल. मलाबादे

पुस्तक ७ वे - **भारतीय संघराज्याचे विघटन टाळण्यासाठी केंद्र- राज्य संबंधांचा फेरविचार**- प्रा. म. द. देशपांडे

पुस्तक ८ वे - **आजची जागतिक परिस्थिती आणि अलिप्तता चळवळ**
डॉ. अशोक चौसाळकर

पुस्तक ९ वे - **भारतातील बेरोजगारी आणि रोजगाराचा हक्क**
डॉ. जे. एफ. पाटील डॉ. व्ही. बी. ककडे

पुस्तक १० वे - **शेवटी हे शिक्षण आहे तरी कोणासाठी ?**
प्रा. एन. डी. पाटील

पुस्तक ११ वे - **आजचे भारताचे अर्थकारण: परकीय कर्ज, गुंतवणूक, सार्वजनिक क्षेत्र, खाजगीकरण, खुला व्यापार, करवाढ, दरवाढ, बेकारी, उपासमार इ.**

पुस्तक १२ वे - **कामगार वर्गापुढील आव्हाने**

---

वार्षिक वर्गणी रोख ७५/- रु. चेकने ८० रु.
(चेक 'प्रबोधन प्रकाशन' या नावे असावा)

**प्रबोधन प्रकाशन**
समाजवादी प्रबोधिनी, ५५६/१ इंडस्ट्रियल इस्टेट
इचलकरंजी ४१६ ११५. फोन : (०२३२४) २२०८५

# आरंभीचे निवेदन...

बेकारी किंवा बेरोजगारीचा प्रश्न हा आपल्या देशाच्या आणि जगभरच्याहि अर्थकरणाचा, समाजकारणाचा आणि राजकारणाचा महत्वाचा व अग्रक्रमांचा बनलेला आहे. रोजगाराचा म्हणजेच काम मिळण्याचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून मान्य केल्याशिवाय बेरोजगारीचा प्रश्न सोडविण्याचा शाश्वत मार्ग सापडणे शक्य नाही हेहि आता मान्य होवू लागले आहे. याच आधारावर बेरोजगारीचे निर्मूलन करता येते हे समाजवादी पध्दतीने दाखवून दिले आहे. अशा या महत्वाच्या व जिव्हाळ्याच्या विषयाची माहीतीपूर्ण व शास्त्रीय चिकित्सा करणारा भारतातील बेरोजगारी आणि रोजगाराचा हक्क हा निबंध समाजवादी प्रबोधिनीच्या अभ्यास व संशोधन विभागाचे प्रमुख सदस्य आणि शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. जे. एफ् पाटील व व्ही. बी. ककडे यांनी लिहीला आहे. तो प्रबोधन प्रकाशन मालेतील १९९२ चे नववे पुस्तक म्हणून आपल्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

'भारतातील बेरोजगारी आणि रोजगाराचा हक्क' हा विषय आता आपल्या देशाच्या, राज्याच्या, शहराच्या, गावांच्या एवढेच नव्हे तर आपल्या प्रत्येक कुटुंबाच्या चिंतेचा बनलेला आहे. साऱ्या देशात आणि प्रत्येक माणसात त्यामुळे बेचैनी निर्माण झालेली आहे.

काम नसणे म्हणजे आराम असणे असं मानण्याची एक पध्दती आहे. मात्र ती तथाकथित सुखवस्तू मंडळींच्यातच आढळते. कारण त्यांची कमाई त्यांच्या कामाशी जोडलेली नसते. बाप कमाईत भर घालण्यासाठीच ते कामधंदे करीत असतात किंवा ती फस्त करण्यात आयुष्य खर्ची घालतात. त्यांचे हे काम आणि धंदे बहुतांशी अनुत्पादक असतात किंवा या ना त्या प्रकारच्या दलालीचे असतात. अर्थात असं पाण्यावर लोणी काढणारे थोडेच लोक समाजात असतात परंतु त्यांचा बोलबाला व प्रभाव जास्त असतो. जणू साऱ्या समाजाचं ते प्रतिनिधीत्व करीत असतात. त्यांना काम हा हक्काचा विषय वाटत नसतो तर आराम हा हक्काचा विषय ते मानतात आणि त्यासाठी ते सतत आग्रह धरतात. हीच मंडळी समाजांचे सांस्कृतिक मुखंड म्हणूनहि मिरवत असतात. त्यातूनच आजवरचे बहुतेक साहित्यिक, लेखक, कवी, नाटककार, कलाकार नावारुपाला आलेले आहेत. कारण अशांच्याच साहित्याला शाई- कागदापासून ग्रंथनिर्मिती पर्यंतच्या सुविधा व प्रसिध्दी देण्यात आलेली असते. त्यामुळे काम

धंद्याची गरज नसणे हे उच्च श्रेणीचे आणि कामाला जुंपलेले असणे हे कनिष्ठ श्रेणीचे लक्षण मानणारा विचार आजवर प्रस्तुत झालेला आहे आणि प्रतिष्ठा पावलेला आहे.

याउलट काम नसणे म्हणजे कमाई नसणे आणि कमाई नसणे म्हणजे जगणे कठीण होणे किंवा अशक्य होणे अशी अवस्था असणारे लोक आपल्या समाजात आहेत. त्यांची संख्या प्रचंड आहे मात्र ते या संस्कृतीच्या कक्षेबाहेर ठेवले गेले आहेत. अर्थात त्यांना काम नसते म्हणजे आराम असतो असे नव्हे उलट त्यांच्यावर कामे लादली जातात. फक्त त्यातून पुरेशी कमाई होत नाही. इतकेच नव्हे तर या कामाची पुन: हमी काहीच नाही केव्हाही हे बंद केले जाते किंवा त्यांना काम करायला बंदी केली जाते. ते पुरेशा कमाईचे किंवा कसल्याच कमाईचे हक्कदारहि नसतात.

असा हा व्यवहार शेकडो वर्षे आपल्या समाजात चालत आलेला आहे. हा सरळ अन्याय आहे असे आज म्हटले जात आहे व त्याला लोकातून पाठींबाहि मिळू लागला आहे परंतु यात काही अन्याय आहे, पक्षपात आहे असे मनात सुध्दा येऊ नये म्हणून या संस्कृतीच्या मक्तेदारांनी कर्मविपाकाचा महान व सोपा सिध्दांत मांडून तो सर्वत्र प्रस्तृत केला आहे. मागच्या केलेल्या पाप- पुण्याची फळे या जन्मी मिळत असतात. त्यानुसार या जन्मी जे कर्म वा जी परिस्थिती वाटणीला आली असेल तिचे इमाने इतबारे पालन केल्यास पुढच्या जन्मी चांगले फळ मिळण्याची हमी आहे असे अमिषाचे गाजरहि डोळ्यापुढे टांगून ठेवण्याची दक्षता या सिध्दांतात घेतलेली असते. शेकडो वर्षे छायेत समाजाची वाटचाल झालेली आहे. कर्मविपाकाची वैचारिक ठेवण आणि वर्णव्यवस्येतील अन्याय श्रमविभागणी हे भारतीय समाजाच्या शेकडो वर्षाच्या वाटचालीचे मुख्य सूत्र राहीले होते.

विज्ञानाच्या उत्पादक संशोधनातून युरोप खंडात झालेल्या औद्योगिक क्रांतीने मानवी समाजजीवनात मूलभूत स्वरुपाचे परिवर्तन घडवून आणले. त्यातून उदयाला आलेल्या ब्रिटीश भांडवलदारी साम्राज्यशाहीने भारतावर आक्रमण केल्यानंतर येथील ही वर्णव्यवस्थेवर आधारलेली समाजपध्दती मागे पडायला सुरवात झाली. साचेबंद सरंजामदारी उत्पादन व्यवस्थेच्या बाजूला श्रम-कौशल्य-उत्पादन आणि कमाई यांची सांगड घालणारी नवी मुक्त पध्दती मांडली जाऊ लागली. वैचारिक व व्यावहारिक क्षेत्रांची जुनी तटबंदी तोडून नवी व्यवस्था विस्तारु लागली.

ही व्यवस्था नवी व प्रगतीकारक असली तरी ती परकीय सत्तेचा हात धरुन आलेली असल्याने त्या परसत्तेच्या हाताने केलेल्या जुलूम जबरदस्तीचे डागहि तिच्यावर पडले होतेच. त्यामुळे ही परसत्ता घालवून टाकण्यासाठी आरंभीच्या

काळी जे उठाव झाले, जी बंडे झाली त्यांनी या नव्या व्यवस्थेच्या वाटाहि अनेक ठिकाणी अडविल्या. मात्र पुढे थोड्याच काळात या परसत्तेचे नाकारायचे काय आणि स्विकारायचे काय याचा विचार या परकीय साम्राज्यशाही विरोधी मोहीमेमध्ये सुरु झाला व रुजू लागला. तसतसा सम्राज्यशाहीच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक सत्तेच्या विरोधाबरोबरच नव्या औद्योगिक उत्पादन पध्दतीचे व तिच्यावर आधारलेल्या समाजपध्दतीचे स्वागत करण्याचा व तिचा स्वतःच्या अखत्यारीत स्वीकार करण्याचा विचार मूळ धरु लागला आणि आकार घेऊ लागला. आपल्या साम्राज्यशाहीविरोधी स्वातंत्र्य लढ्यातील प्रमुख प्रवाहानी औद्योगिक भारताची उभारणी करण्याचे आपले उद्दिष्ट निःसंदेग्धपणे घोषित केले. त्यातूनच श्रम- कौशल्य- उत्पादन व कमाई यांचे नवे समीकरण हे आमच्या राष्ट्रीय विचारांचे सूत्र म्हणून मान्यता पाऊ लागले.

स्वराज्य, सुराज्य, कल्याणकारी राज्य, समाजवाद अशी वाढत्या श्रेणीची ध्येय धोरणे जाहीर करुन त्यामागे लोकबळ उभे करण्याचे प्रयत्न आपल्या स्वातंत्र्य आंदोलनात सतत व नेटाने केले जाऊ लागले. त्यातूनच बेकारीचे किंवा बेरोजगारीचे निर्मूलन करुन सर्वांना काम आणि कामाचे योग्य दाम देणारी व्यवस्था निर्माण करण्याला आपली बांधिलकी असल्याचा दावा हे प्रमुख प्रवाह व त्यांचे पक्ष करु लागले. त्यातून स्वतंत्र भारताच्या राज्य घटनेचे आराखडे लोकबळाची मान्यता घेण्यासाठी प्रत्यक्षात स्वांतंत्र्य मिळण्याच्या आगोदरच जाहीर होवू लागले. त्यामध्ये नागरीकांच्या मूलभूत हक्कांची यादी विषद केली जाऊ लागली. तीमध्ये जिवंत राहण्याचा हक्क, मत वनविण्याचा हक्क, त्या मताचा प्रचार. प्रसार करण्याचा, त्यासाठी संघटन करण्याचा, मतदानाचा, प्रतिनिधीत्व करण्याचा इत्यादी व्यक्ति स्वातंत्र्याच्या कक्षेत येणारे सर्व हक्क, त्यासाठी आवश्यक असणारी स्वातंत्र्ये, त्याचप्रमाणे मालमत्ता वाळगण्याचा हक्क, कामाचा व फुरसतीचा हक्क, शिक्षणाचा व व्यवसाय निवडीचा हक्क यांचीहि आश्वासने देण्यात आली. त्यांचा प्रचार करण्यात आला. तसे जाहीरनामे फडकू लागले. अशा प्रकारे वेगवेगळ्या मूलभूत हक्काबाबतची लोकमानसिकता तयार होवू लागली. त्यांना राष्ट्रीय मताचा दर्जा प्राप्त झाला. राजकारण, अर्थकारण, समाजकारण, कायदेकानून आणि नितीनियम या अशा अनेक अंगोपांगांची दैववादाच्या व कर्मविपाकवादाच्या प्रभावापासून मुक्तता झाली. वर्णव्यवस्थेला नकार देण्यात आला. वर्ग व्यवस्थेचा स्वीकार करण्यात आला.

स्वराज्य, सुराज्य, कल्याणाकारी राज्य या टप्प्यापर्यंतची प्रगतीची वाटचाल वर्गीय समाजव्यवस्थेत करणे शक्य असते. समाजवादाच्या टप्प्यावर जाताना मात्र ही वर्गीय व्यवस्था अडसर बनते. ब्रिटीश साम्राज्यशाहीच्या अंमलाखालील दीडशे वर्षाच्या कालखंडात आलेल्या औद्योगिकरणाबरोबर प्रस्थापित वर्णव्यवस्थेचे

विघटन होत होत नवी वर्गव्यवस्था आकार घेऊ लागली. तीमध्ये भांडवलदार, कामगार व आधुनिक मध्यमवर्ग असे नवे वर्ग उदयाला आले. त्याचप्रमाणे सरंजामदारी व्यवस्थेतील जमीनदार शेतकरी, शेतमजूर हे समाजघटक नव्या वर्गीय स्वरुपात प्रगट होवू लागले. औद्योगिक भांडवलदारी व्यवस्थेत हे अटळच असते. खरं म्हणजे औद्योगिक भांडवलदारी पध्दतीचा उदय व विकास होत असताना प्रस्थापित सरंजामदारी पध्दती नष्ट करण्याची कामगिरी हा नवा भांडवलदार वर्ग करीत असतो. परंतु आपल्या भारतात औद्योगिक भांडवलदारी व्यवस्थेचा जो उदय झाला आहे तो ब्रिटीश साम्राज्यशाहीच्या प्रेरणेने व तिच्या गरजेपोटी झाला आहे. तिला येथील सरंजामदारी व्यवस्था नष्ट करण्यात काही रस नव्हता. सधन गिऱ्हाईक म्हणून त्या वर्गाची तिला गरजहि होती. त्यामुळे भारतात औद्योगिक भांडवलदारी पध्दतीचा उदय व विकास होताना येथील सरंजामदारीचा विनाश होण्याची ऐतिहासिक प्रक्रिया घडून आली नाही. त्याऐवजी नवोदित औद्योगिक भांडवलदार आणि प्रस्थापित सरंजामदार यांच्या सलोख्याच्या सहभागातून ही विकास प्रक्रिया चालू राहिली. याचा परिणाम असा झाला की येथे वर्गीय समाजाची पूर्ण आणि सर्वांगीण निर्मिती आणि वाढ झाली नाही आणि सरंजामशाहीने जोपासलेल्या वर्णव्यवस्थेचा पूर्ण विनाश आणि निचरा झाला नाही. त्यामुळे श्रमजीवी जनतेचे वर्ग व वर्ण असे संमिश्र स्वरुप तयार झाले. राजकारण, अर्थकारण, समाजकारण यावर त्याचा नेमका परिणाम म्हणजे त्यावर या भांडवलदार व सरंजामदार वर्गाचे वर्चस्व प्रस्थापित झाले. स्वातंत्र्य आंदोलनाच्या नेतृत्वावरहि त्यांचा प्रभाव राहिला. त्यामुळे स्वातंत्र्य आंदोलनाच्या उठावणीच्या ओघात जरी समाजवादाच्या घोषणा करण्यात आल्या किंवा शेतकरी कामगार प्रजाराज्याची आश्वासने देण्यात आली तरी स्वातंत्र्य आंदोलनाच्या प्रमुख प्रवाहाची म्हणजे काँग्रेसची कल्याणकारी राज्याची कक्षा ओलांडण्याची तयारी नव्हती. हे प्रत्यक्ष राज्यघटना तयार करतेवेळी स्पष्ट झाले. आपल्या या घटना समितीची निवड मुळांत ब्रिटीश सरकारच्या १९३५ च्या निवडणूक कायद्यानुसार १९४६ साली निवडून आलेल्या लोकसभा सभासदातून झाली. या कायद्याप्रमाणे मालमत्तादरांनाच मताचा अधिकार होता., प्राप्तीकर भरणारे, किमान १६ रुपये शेतसारा वा घरफाळा भरणारे अशानाच मताचा अधिकार या कायद्याने दिलेला होता. अशा या घटना समितीने स्वतंत्र भारताची राज्यघटना बनविली. तीमध्ये मालमत्तेचा अधिकार हा मूलभूत हक्कात समाविष्ट करण्यात आला आणि काम मिळण्याचा म्हणजे रोजगाराचा हक्क हा मार्गदर्शक तत्वात घालण्यात आला. मूलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वातील हक्क यातील फरक या पुस्तिकेत स्पष्ट करुन सांगितला आहेच.

अशा या पार्श्वभूमीवर आजची भारतातील बेकारी म्हणजे बेरोजगारी,

तिची अंगोपांगे आणि तिची व्याप्ती. ती निर्माण होण्याची व वाढत जाण्याची कारणे यांची अनेक बाजूनी माहीतीपूर्ण चर्चा या पुस्तिकेच्या पहिल्या भागात केलेली आहे. आज या बेरोजगारीचे आक्राळ विक्राळ स्वरुप दिसत असले आणि नव्या खुलेपणा, अधुनिकीकरण, खाजगीकरण आणि जागतिक बाजारातील भागीदारी यांचा समावेश असलेल्या आर्थिक - औद्योगिक धोरणामुळे ते आणखी वाढण्याचा धोका दिसत असला तरी ही बेरोजगारी आपल्याला कावूत आणता येणार नाही. किंवा सर्वांना काम देता येणार नाही असे नाही. एकतर आपल्या देशाजवळ नैसर्गिक सामर्थ्याचे प्रचंड स्रोत आहेत आणि आजहि ते जिवंत आहेत. त्यांचा उपयोग करण्यासंबंधीचे लोकाभिमुख धोरण हवे आणि ते राबविणयाची राजकर्त्यांजवळ इच्छाशक्ती पाहिजे आणि लोकबळाच्या सामूहिक सहभागाच्या संधी खुल्या करण्यात आल्या पाहिजेत. हे होण्यासाठी राजकर्त्यांच्या बाजूने योग्य व हवी तेवढी हालचाल होईल असे आजवरच्या अनुभवावरुन म्हणता येत नाही. तेव्हा मग लोकपातळीवरुन ही बेरोजगारी हटविण्याची व्यापक मोहिम उभारली जाणे जरुर झालेले आहे. अशा लोकमोहिमेसाठी उदात्त, अंतीम व शाश्वत उद्दिष्टाची आवश्यकता असते. तशा घोषणेने सारा देश दूमदूमून गेला पाहिजे. ती घोषणा म्हणजे 'रोजगाराचा मूलभूत हक्क' ही होय. ही घोषणा केवळ आदर्श वा स्वप्नील नसून आजच्या भारतीय परिस्थितीच्या वास्तवातहि ती प्रत्यक्षात आणणे कसे शक्य आहे व आवश्यक आहे याचे विवेचन या पुस्तिकेच्या दुसऱ्या भागात केलेले आहे.

आपल्या देशातील सध्याची बेरोजगारी निरनिराळ्या प्रकारची आहे. उघड व छुपी बेरोजगारी हे तर अगदी ढोबळ प्रकार आहेत. शिवाय काळ्या पैशावर चालणाऱ्या काळ्या धंद्यात गुंतलेली रोजगारी ही खऱ्याखुऱ्या राष्ट्रीय अर्थाने बेरोजागारीच आहे. तिचे संख्याबळ मोठे असून ते देशव्यापी आहे. इतकेच नव्हे तर जागतिक व्यवस्थेतील भागीदारीचा टप्पा तिने केव्हाच गाठलेला आहे. ही रोजगारी मोठ्या प्रमाणात अनुत्पादक आहे. एवढेच नव्हे तर राष्ट्रीय उत्पादकेच्या वाटा रोखून धरण्याचे कामहि ती करीत असते. अब्जावधी रुपयांची उलाढाल या उदयोगांत होत असते. मात्र राष्ट्रीय उत्पन्नात तिची मोजदाद केली जात नाही. त्यामुळे राष्ट्रीय व्यवसाय, राष्ट्रीय उत्पन्न आणि अधिकृत चलन याना एक प्रकारचे दुय्यम स्थान प्राप्त झाले आहे. आणि नवे उद्योगक्षेत्र उभारण्याची आणि राष्ट्राची रोजगार क्षमता वाढविण्याची कुवत ही अधिकृत संपत्ती गमावून बसलेली असते. या कमजोरीची भरपाई करण्यासाठी कर्जाचे बोजे उभारण्याचे मार्ग स्वीकारले जातात आणि त्याला काही पर्याय नाही अशी केवीलवाणी आगातिकता व्यक्त करण्यात येते.

आपल्या देशातील बेरोजगारीचे आकडे रोजच्या रोज वाढत, फुगत चालले

आहेत. उघड व छुप्या बेरोजगारीबरोबरच अनाधिकृत किंवा काळी रोजगारी मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे. अशावेळी अधिकृत रोजगारीची अवस्था कशी आहे? संघटित व असंघटित अशा दोन क्षेत्रात ही अधिकृत रोजगारी विभागली गेली आहे. रोजगारी संबंधीचे अनेक कायदे अस्तित्वात आहेत. अगदी दुकाने, व्यापारी संस्थांच्या कायद्यापासून फॅक्टरी कायद्यापर्यंतचे कायदे त्या त्या व्यवसायांची राष्ट्रीय व्यवहार पध्दती व शिस्त सांगणारे आहेत. त्याचबरोबर किमान वेतनापासून पेन्शन, प्राव्हिडंड फंड, नुकसान भरपाई, आरोग्य सेवा, औद्योगिक सुरक्षा व्यवस्था यांची कामागारांना हमी देणारे कायदेहि आहेत. साऱ्या जगातल्या प्रमाणेच येथेहि आठ तासाचा कामाचा दिवस मान्य झालेला आहे. कचेऱ्या, शिक्षण संस्था यामध्ये तर तो सहा तासांचा सुध्दा मानला जातो. असे असताना रोजगार असणाऱ्या लक्षावधी कामगारांना रोज आठाऐवजी दहा, बारा तास काम करावे लागते आणि तरीही त्यांची कमाई किमान वेतनाहून कमीच भरते. याचा अर्थ रोजगार असणारांनासुध्दा अंशिक बेरोजगारीचा फटका बसत अदतो. वरं ही अंशिक वेरोजगारी नाकारावी तर पूर्ण रोजगारी मिळेल असे नाही तर पूर्ण बेरोजगारीच वाट्याला येईल अशी प्रत्यक्षात परिस्थिती असल्याने हा बेरोजगारीचा अंगभूत बोजा अधिकृत रोजगारीला सतत वाहून न्यावा लागत आहे.

आपल्या देशातील ही जी उघड व छुप्या बेरोजगारीची, तसेच अनाधिकृत काळ्या रोजगारातील बेरोजगारीची आणि अधिकृत रोजगारीतील अंशिक बेरोजगारीची जिती जागती व्यवस्था आहे तिचे प्रमुख कारण म्हणजे भांडवलदार जमीनदार वर्गाचे आपल्या अर्थव्यवस्थेवरील वर्चस्व. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यामध्ये झालेली मक्तेदारीची वाढ. स्वांतंत्र्य प्राप्तीनंतर सरकारने स्वीकारलेल्या मिश्र अर्थव्यवस्थेत या खाजगी मालकीच्या विभागाचे वर्चस्व कायमं ठेवल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. एवढेच सूत्र रुपाने येथे नमूद करीत आहे. या विषयाची तपशिलवार चर्चा याठिकाणी अपेक्षित नाही., परंतु आपल्या या मिश्र अर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र अशी औद्योगिक विभागात दोन क्षेत्रे कार्यरत राहिली आणि त्यातील सार्वजनिक क्षेत्राने खाजगी क्षेत्रापेक्षा अधिक रोजगार निर्मिती केली हेहि या पुस्तिकेतील माहितीवरुन आपल्या लक्षात येईल.

शेती हा आपला अजूनहि मुख्य व्यवसाय आहे. परंतु शेत जमिनीच्या मालकीतील मक्तेदारी स्पष्ट करणारी विषमता अजूनहि कायम आहे. पाच एकरापेक्षा कमी जमीन असणाऱ्या खातेदारांची संख्या ७४.५ टक्के आहे आणि त्यांच्याकडे एकूण लागवडीखालील जमिनीपैकी फक्त २६.३१ टक्के जमीन आहे. ५ ते १० एकरापर्यंच्या खातेदारांची संख्या १४.०१ टक्के असून त्यांच्याकडे २९.७ टक्के क्षेत्र आहे. आणि २५ एकरापेक्षा अधिक जमिन असलेल्या खातेदारांची

संख्या २.४ टक्के एवढीच असून त्यांच्याडे २२.८ टक्के इतके जमिनीचे क्षेत्र आहे. शेती उत्पन्न देणाऱ्या जमीन मालकांची ही विषम व मक्तेदारीची परिस्थिती केवळ गरिबी व श्रीमंती यातील दरीच दाखवून देते असे नाही तर शेती क्षेत्रातील बेरोजगारीचे मुख्य कारण ढळढळीतपणे स्पष्ट करते याचवेळी पश्चिम बंगालमधील डाव्या आघाडीच्या राज्यसरकारने प्रचलित कायद्यांच्या कक्षेत राहूनच वरकड जमिनीचे वाटप केले आणि कुळांचे हक्क मिळवून दिले. परिणामी साडेसात लाख कुटुंबाना शेतीत स्वयंरोजगार मिळाला आणि हातमाग व इतर ग्रामीण गृहउदयोगांना चालना मिळून आणखी बारा लाख लोकांना ग्रामीण भागातच रोजगार मिळाला आहे. जमिनीच्या फेरवाटपातील रोजगार देण्याची क्षमता यावरुन सिध्द होते. याशिवाय अधिकृत माहीतीनुसार आपल्या देशात एकूण जमिनीपैकी निम्मी म्हणजे ४० कोटी एकर जमीन ही पड जमीन म्हणून पडलेली आहे. आपल्या महाराष्ट्रातहि अडीच कोटी एकर जमीन अशीच पड आहे. तिच्यावर पीके, चारा व जंगल यांची लागवड होवू शकते आणि राष्ट्रीय संपत्तीत भर पडून राष्ट्रीय भांडवल निर्मितीत आपण स्वावलंवी वनू शकतो. त्याचबरोबर अगदी ५ एकरामागे एका कुटुंबाला रोजगार द्यायचे म्हटले तरी ८ कोटी कुटुंबाना रोजगार देता येईल म्हणजेकिमान ४० कोटी लोकांना किमान पातळीवरील राहणीमान मिळू शकेल. जमीन आणि मनुष्यबळ हे दोन्हीहि राष्ट्रीय संपत्ती निर्माण करणारे मुख्य स्त्रोत आहेत. त्यांची विपुलता आपल्या जवळ आहे. मात्र त्यांचे योग्य नियोजन करण्यासाठी आवश्यक असणारी राष्ट्रीय राजकीय इच्छाक्ती आपले राज्यकर्ते स्वातंत्र्याच्या सत्तेचाळीस वर्षात दाखवू शकले नाहीत. हेच यावरुन स्पष्ट होते.

आपली जमीन आणि आपले मनुष्यबळ यांची योग्य उत्पादक सांगड घांलणे इतरहि बाजूनी आपल्या आवाक्यातील आहे, कारण पाणी, वारा, सूर्यप्रकाश आणि हवामानांचे हंगाम यांचे बावतीत आपला देश नैसर्गिक दृष्ट्याच सक्षम व समृध्द आहे. त्यामुळे आपण शेती क्षेत्रात पुरेशी संपन्नता संपादन करु शकतो. आणि एकदा का हे ८ कोटी कुटुंबांच्या रोजगारीचे उद्दिष्ट या प्राथमिक क्षेत्रात पूर्णतया गाठले की, त्यातून सर्वात प्रथम जी गोष्ट होणार आहे ती ही की, ही ८ कोटी कुटुंबे ४० कोटी गिऱ्हाईकांची बाजारपेठ म्हणून जिवंत होणार आहेत. आणि त्यांच्या अगदी प्राथमिक गरजा, कापड, औषधे, शिक्षण, निवारा, वाहतूक यासारख्या गरजा भागविण्यासाठी लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनासाठी छोटे- मध्यम व मोठे कारखानदारीचे प्रकल्प चोवीस तास पूर्णक्षमतेने चालवावे लागतील (आज त्यांची ४० टक्के क्षमता न वापरता थिजवून ठेवली जाते.) त्यामध्ये मोठ्या प्रमाणात नवा रोजगार निर्माण होईल. कदाचित रोजगारी मनुष्यबळाची कमतरता भासू लागेल. अशावेळी सर्वच उद्योगामध्ये नवे तंत्रज्ञान व आधुनिकीकरण

यांची गरज वाटू लागेल. ती एक स्वाभाविक प्रक्रिया ठरेल. नवे तंत्र व नवे यंत्र येथे येईल पण ते एकाहि माणसाला बेरोजगार करणार नाही अशी अवस्था योग्य राजकीय, औद्योगिक, आर्थिक धोरण आखून त्याची अंमलबजावणी केली तर निर्माण होवू शकेल.

आपल्या देशातील अगदी आजच्या अडचणीत व अरिष्टात सापडलेल्या अर्थव्यवस्थेत राष्ट्राचा जो काही आर्थिक आराखडा मांडला जात आहे त्यामधून सुध्दा या दिशेने वाटचाल करणे शक्य आहे हे दाखवून देणारे विवेचनहि या पुस्तिकेच्या दुसऱ्या व तिसऱ्या भागात केलेले आहे.

या सर्वच बाबींचा साकल्याने आणि लोकाभिमुख दृष्टीने विचार केला तर आपण आपल्या देशातील बेरोजगारीचे आजचे अरिष्ट व वाढत जाणारे संकट निवारु शक्यतो हे खात्रीपूर्वक लक्षात येऊ शकेल. त्याचबरोबर रोजगारांचा हक्क, काम मागण्याचा हक्क आणि फुरसतीचा हक्क हा आमच्या मूलभूत हक्कात आत्मविधासाने समाविष्ट करु शकतो हेहि लक्षात येईल. आमचा निसर्ग, आमचा सूर्य, आमचा वारा, आमची जमीन, आमचे मनुष्यबळ, आमचे पशुबळ, आमच्या खाणी, आमची जलसंपत्ती, आमचे कारखाने, आमची उर्जाक्षेत्रे या सर्वामध्येच आपण श्रम- कौशल्य- उत्पादन आणि कमाई याची प्रमाणबध्द सांगड घालू शकतो आणि आपला भारत खऱ्या व पूर्ण अर्थाने स्वतंत्र, सार्वभौम, आत्मनिर्भर व प्रगत बनविण्याची शिस्तबध्द वाटचाल करु शकतो. हे सर्व करणारी आपली मुख्य शक्ती आहे ती म्हणजे आपले लोकबळ, आपले मनुष्यबळ ते सक्रीय, सक्षम व प्रगत बनविण्यासाठी आवश्यक अशी प्राथमिक अट आहे ती रोजगाराचा हक्क हा मूलभूत हक्क म्हणून मान्य करणे आणि तो सार्वत्रिक स्वरुपात अंमलात आणणे ही. यासाठी आवश्यक असणारी जाणीव परिवर्तनवादी कार्यकर्त्यात निर्माण करण्यास आणि तिला व्यापक अशा लोकमानसिकतेचा आधार मिळवून देण्यास ही पुस्तिका चालना देईल असा मला विश्वास वाटतो.

**शांताराम गरुड**
सरचिटणिस

जवाहरलाल नेहरु जन्मदिन
१४ नोव्हेंबर १९९२

**समाजवादी प्रबोधिनी**
५५६ / १, इंडस्ट्रियल इस्टेट,
इचलकरंजी ४१६ ११५.

# भारतातील
# बेरोजगारी आणि रोजगाराचा हक्क

डॉ. जे. एफ. पाटील
डॉ. व्ही. बी. ककडे
राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## प्रास्ताविक...

गेली चाळीस वर्षे आपण विकासासाठी आर्थिक नियोजन राबवित आलो आहोत. परंतु एवढ्या प्रदीर्घ प्रयत्नानंतरदेखील दारिद्रय, विषमता आणि बेरोजगारी हे आपले मूलभूत प्रश्न म्हणाव्या त्या प्रमाणात, गुणात्मकतेने व समाधानकारकपणे सुटलेले नाहीत. मोठी व झपाट्याने वाढणारी लोकसंख्या हे त्याचे एक मुलभूत महत्वाचे कारण आहे तसेच आर्थिक धोरणातील धरसोडपणा, प्रश्न सोडविण्यासाठी आवश्यक असलेल्या राजकीय इच्छा शक्तीचा अभाव, राजकारणीतील चढउतार आणि विकास कार्यक्रमांच्या कार्यवाहीतील अक्षम्य भोंगळपणा यामुळे हे प्रश्न सुटण्याऐवजी अधिकाधिक गुंतागुंतीचे होत चालले आहेत.

### विकासाचा अर्थ

वास्तव राष्ट्रीय उत्पन्न किंवा वास्तव दरडोई उत्पन्न यांच्या वार्षिक वाढीच्या दरावरुन विकासाचा अर्थ लावण्याची किंवा विकास मोजण्याची पध्दत आता मागे पडली आहे. विकास या संकल्पनेचा अधिक मूलभूत, मानण्याशी सुसंगत आणि अधिक व्यापक अर्थ स्पष्ट करण्याचे प्रयत्न झाले आहेत. जीवन निर्वाहाची साधन शक्ती निर्माण करणे, स्वाभिमानी पध्दतीने जगता येणे व सर्व प्रकारच्या आर्थिक (सामाजिक, राजकीय देखील) गुलामगिरीपासून मुक्ती म्हणजेच निवडीचे पूर्ण स्वातंत्र्य हे मूलभूत घटक विकासाच्या संकल्पनेत गृहीत धरले पाहिजेत. या अर्थाने विचार करता असे म्हणता येईल की जेव्हा काम करण्याची इच्छा असणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला त्याच्या आवडीच्या, त्याच्या क्षमतेस व कौशल्यास सुसंगत असा उत्पादक, अर्थपूर्ण व समाजपयोगी रोजगार सातत्याने मिळतो तेव्हाच त्या समाजाचा खऱ्या अर्थाने आर्थिक विकास झाला असे म्हणता येईल म्हणजेच पूर्ण रोजगार किंवा बेकारी निर्मूलन हे विकासाचे व्यवच्छेदक लक्षण मानणे आवश्यक आहे. अर्थात इतर निकष लक्षात घेऊन प्रत्येक व्यक्तीला

आवडीचा रोजगार मिळणे ही आदर्शवादी विकासाची अवस्था असेल तर आवडीचा नसला तरी क्षमता व कौशल्याशी सुसंगत असा रोजगार मिळणे हा व्यावहारिक दृष्ट्या विकासाचा किमान अर्थ मानावा लागेल. या ठिकाणी एका गोष्टीचा स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे की, मोठी व झपाट्याने वाढणारी लोकसंख्या हे वाढत्या बेकारीचे महत्वाचे कारण आहे हे जरी खरे असले तरी त्यामुळे रोजगाराचा हक्क मूलभूत हक्क करता येणार नाही असा मात्र निष्कर्ष काढला जाऊ नये. कारण आपल्याहिपेक्षा जास्त व वेगाने वाढणारी लोकसंख्या असलेल्या चीनसारख्या देशात रोजगाराचा हक्क मूलभूत हक्कामध्येच समाविष्ट केलेला आहे.

**संकल्पनात्मक पार्श्वभूमी**

पूर्ण रोजगाराची परिस्थिती किंवा बेरोजगारीच्या पूर्ण अभावाच्या परिस्थितीची चर्चा करण्यापूर्वी बेरोजगारीच्या संकल्पना स्पष्ट करणे आवश्यक आहे.
प्रचलित वेतनदराला काम उपलब्ध असूनही जेव्हा एखादी सक्षम व्यक्ती काम करु इच्छित नाही तेव्हा ती व्यक्ती ऐच्छिक बेरोजगारीच्या अवस्थेत आहे असे (भांडवलशाही अर्थशास्त्रात) मानले जाते. अशा प्रकारची ऐच्छिक बेरोजगारी आर्थिक समस्या मानता येणार नाही. ती कदाचित व्यक्तीगत / कौटुंबिक स्वरुपाची मानसिक समस्या ठरु शकते. तिचे प्रमाण जास्त झाल्यास त्यातून सामाजिक व राजकीय प्रश्नहि निर्माण होऊ शकतील. ऐच्छिक बेरोजगारीमध्ये उत्पादन साधनांच्या मालकी मधून इतरांची पिळवणूक करु शकणाऱ्या सामाजिक घटकांचा काही प्रमाणात संकेत मिळतो परंतु ऐच्छिक बेरोजगारी हा या ठिकाणी विश्लेषणाचा विषय नाही. तसेच हेहि लक्षात घेणे आवश्यक आहे की, ऐच्छिक बेरोजगारीचा प्रश्न भांडवलशाही समाजातच निर्माण होऊ शकतो कारण समाजवादी समाजव्यवस्थेत प्रत्येकाला काम व कामाप्रमाणे दाम या नियमाबरोबरच जो काम करु शकेल तोच खाऊ शकेल असाही नियम असतो कारण प्रत्येक व्यक्ती (१८ ते ५९ वर्षे या वयोगटात) ही राष्ट्रीय उत्पन्नाची उत्पादक शक्ती असते आणि ही शक्ती ती व्यक्ती फक्त काम करुनच व्यक्त करु शकते. समाजवादी रचनेत मला काम नको असे म्हणण्याचा हक्कच असू शकत नाही.

परंतु जेव्हा प्रचलित वेतनदरावर काम करण्याची इच्छा आहे, क्षमता आहे काम शोधण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला जात आहे व रोजगार मिळत नाही तेव्हा अनैच्छिक बेरोजगारीचे अस्तित्व स्पष्ट होते. अनैच्छिक बेरोजगारी हाच सामाजिक व आर्थिकदृष्ट्या खरा अधिक गंभीर प्रश्न आहे. कारण त्यातून दारिद्र्य म्हणजेच निर्वाह साधनशक्तीचा अभाव व्यक्त होतो.

स्वाभिमानाने जगण्याची शक्यता नष्ट होते. आर्थिक व पर्यायाने सामाजिक, सांस्कृतिक स्वातंत्र्याचा ऱ्हास व शेवटी अस्त होतो.

प्रचलित अर्थशास्त्रीय साहित्याचा विचार करता अनैच्छिक बेरोजगारीचे विविध प्रकार स्पष्ट झालेले दिसतात. **उघड बेकारी** वर स्पष्ट केलेल्या स्वरुपाची असते. याउलट मागास देशात किंवा मागास क्षेत्रामध्ये प्रच्छन्न म्हणजेच **छुपी बेरोजगारी** मोठ्या प्रमाणात आढळते जे काम करण्यासाठी दोन कामगार लागतील त्यासाठी जर चार कामगार काम करीत असतील तर दोन कामगार छुपे बेरोजगार आहेत अशी छुपी बेरोजगारी मागास देशांच्या ग्रामीण उद्योगात व विशेषतः शेतीमध्ये अधिक प्रमाणात दिसते. अशा ठिकाणी संबंधित कामातून दोन कामगार कमी केले तरी एकूण उत्पादन कमी होत नाही. यालाच तांत्रिक परिभाषेत श्रमाची सीमांत उत्पादकता शून्य आहे असे म्हणतात.

सर्वसाधारणपणे प्रगत औद्योगिक अर्थव्यस्थांमध्ये उघड बेरोजगारी प्रकर्षाने दिसते. आर्थिक परिस्थितीच्या चढउताराबरोबर उघड बेरोजगारीचे प्रमाण कमी जास्त होत जाते. त्या अर्थाने विचार करता अशा अर्थव्यवस्थातून **व्यापारचक्रीय बेरोजगारी** हा प्रश्न अधिक महत्वाचा ठरतो. अशी चक्रीय स्वरुपाची बेरोजगारी एकूण मागणीच्या कमतरतेमुळे निर्माण होते. एकूण मागणीची कमतरता बहुधा उत्पन्नाच्या अतिरिक्त विषम वाटपामुळे निर्माण होते. काही वेळेला गुंतवणूकीच्या नव्या संधीचा अभाव, भविष्यकालीन आर्थिक परिस्थितीबद्दल निराशाजनक अपेक्षा व तंत्रवैज्ञानिक गतीशून्यता यातूनही चक्रीय बेरोजगारी निर्माण होऊ शकते. काही वेळेस सरकारच्या राजकोषीय, चलनविषयक, औद्योगिक आणि व्यापारविषयक धोरणांच्या वास्तवांशी असलेल्या विसंगतीतून मागणीची कमतरता निर्माण होऊ शकते. भांडवलशाही अर्थशास्त्रामध्ये मुख्यता मागणीच्या कमतरतेतून निर्माण होणाऱ्या बेरोजगारीच्या प्रश्नाचा सविस्तर विचार झालेला आहे. केन्स यांच्या अर्थशास्त्रीय विश्लेषणाचा चक्रीय बेरोजगारी हा केंद्रबिंदू होता. प्रगत औद्योगिक अर्थव्यवस्थांमध्ये नेहमी आढळणाऱ्या बेरोजगारीचा आणखी एक प्रकार म्हणजे **घर्षणात्मक बेरोजगारी** होय. अशा बेरोजगारीचे प्रमाण एकूण श्रमशक्तीच्या २ ते २.५% पेक्षा जास्त असत नाही असा अनुभव आहे. वेगवेगळ्या औद्योगिक क्षेत्रात तात्कालिक परिस्थितीमुळे जे लोक बेरोजगार होतात परंतु अल्पावधितच थोड्याफार प्रयत्नाने त्यांना नवीन रोजगार उपलब्ध होतो. तेव्हा तशा लोकांच्या अल्पकालीन बेरोजगारीस घर्षणात्मक बेरोजगारी असे नाव दिले जाते.

विकसनशील देशांचा विचार करता बेरोजगारीचे आणखी दोन प्रकार लक्षात घ्यावे लागतात. **तंत्रवैज्ञानिक बेरोजगारी व सुशिक्षितांची बेरोजगारी** हे होय. विकसनशील देश विकासाच्या प्रक्रियेमध्ये अधिकाधिक प्रगत उत्पादनतंत्राचा स्वीकार करु लागतात. सर्व साधारणपणे प्रगत तंत्रविज्ञान अधिक भांडवलप्रधान

असते व परिणामी श्रमासाठी असलेली मागणी कमी करते. साहजिकच अल्प व मध्यम काळात तंत्रवैज्ञानिक विकासामुळे काही लोकांना रोजगार गमवावा लागतो. तेव्हा तंत्रवैज्ञानिक बेरोजगारी निर्माण होते. याबाबतीत संगणक तंत्राचा विविध क्षेत्रात वापर केल्यामुळे जी बेरोजगारी निर्माण होणार आहे तिचे उदाहरण पटकन लक्षात घेता येईल. काहींच्या मते दीर्घ काळात असे बेरोजगार तंत्रवैज्ञानिक प्रगतीमुळे निर्माण झालेल्या नव्या औद्योगिक क्षेत्रात सामावून घेतले जातात. लोकसंख्या व पर्यायाने श्रमशक्तीच्या बदलाचे गतीशास्त्र व प्रमाण लक्षात न घेता वरील मताची सत्यता पडताळून पाहणे, मोठी व वेगाने वाढणारी लोकसंख्या असलेल्या विकसनशील देशात तरी शक्य होईल असे वाटत नाही. एवढेच नव्हे तर एका मर्यादित अर्थाने तंत्रवैज्ञानिक बेरोजगारी असणे हे आर्थिक विकासाचे व पर्यायाने अर्थव्यवस्थेच्या गतीमानतेचे लक्षण मानले जाते.

सुशिक्षितांच्या बेरोजगारीचा प्रश्न हाहि मुख्यतः विकसनशील देशांच्या बाबतीतच अधिक प्रमाणात आढळून येतो. दुसऱ्या महायुध्दानंतर बहुसंख्य मागास देश स्वतंत्र झाले. त्यापैकी आग्नेय आशिया खंडातील बहुतेक राष्ट्रे अतिरिक्त लोकसंख्या असणारी आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या देशातून विशेषतः भारतात लोकशाही समाजवादी समाजरचनेच्या प्रभावाखाली काहीशा नियोजित पध्दतीने शिक्षणसंधींचा विस्तार करावा लागला. ज्या वेगाने विविध क्षेत्रातील रोजगार वाढत होता त्यापेक्षा अधिक वेगाने संबंधित शिक्षण घेणाऱ्या, शिक्षण पूर्ण करणाऱ्या लोकांची संख्या वाढत राहिली. मॅट्रिक पास झालेले, पदविका व पदवी घेतलेले, पदव्यूत्तर शिक्षण घेतलेले तसेच व्यावसायिक व तंत्रवैज्ञानिक शिक्षण घेतलेले अशा तरुणांची संख्या रोजगार संधीच्या संख्येपेक्षा अधिक वेगाने वाढली. साहजिकच अशा सुशिक्षित बेरोजगारांची संख्याहि वाढत गेली.

यातूनच काही प्रमाणात अपुऱ्या रोजगाराची (under employment) समस्या निर्माण होते. जेव्हा व्यक्तीच्या शिक्षण व कौशल्याच्या मानाने कमी दर्जाचे काम त्याला करावे लागते तेव्हा त्याला अपुऱ्या रोजगारीचा प्रश्न निर्माण होतो. भारतामध्ये वरील सर्व प्रकारची बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आढळते हे कटुसत्य आहे. अर्थात या ठिकाणी असे मानण्याचे कारण नाही की गेल्या ४० वर्षात आर्थिक विकासाच्या योजनाबध्द प्रयत्नामुळे रोजगारसंधी निर्माण झालेलीच नाही. पण ज्या वेगाने श्रमशक्ती वाढली त्या वेगाने रोजगारसंधी वाढली नाही व त्यामुळे मुळात असणारा बेरोजगारीचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा व संख्यात्मकदृष्ट्या मोठा होत गेला. हे समजून घेण्यासाठी आपण प्रथम काही आकडेवारी मांडून भारतातील बेरोजगारीचे बदलते स्वरुप व व्याप्ती स्पष्ट करु.

**भारतातील रोजगार रचना व प्रवृत्ती**

रोजगारी आणि बेरोजगारी या संदर्भात भारतात सध्या उपलब्ध होणारी आकडेवारी मुख्यतः राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटन (NSSO), वार्षिक औद्योगिक सर्वेक्षण (ASI) व भारत सरकारच्या श्रममंत्रालयामार्फत संकलित केली जाणारी रोजगारविषयक माहिती (EMI) या स्त्रोत्रातून उपलब्ध होते. विशेषतः राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटन १९७२-७३ पासून दर पाच वर्षांनी या बाबतीत आकडेवारी गोळा करते. अलिकडेच नियोजन मंडळामार्फत **Employment : Past Trends & Prosperts for 1990's** 'रोजगार : गतकालीन प्रवृत्ती व १९९० ते २००० या कालखंडासाठी शक्यता' हा निबंध सादर झाला त्यावरुन रोजगारविषयक परिस्थितीची बरीच माहिती उपलब्ध होते.

**श्रमिक - लोकसंख्या प्रमाण**

तक्ता क्र. १ मध्ये भारतातील श्रमिक लोकसंख्या प्रमाण दिले आहे.

तक्ता क्रं. १

**भारतातील श्रमिक - लोकसंख्या प्रमाण (%)**

| १९६१ जनगणना | १९७१ जनगणना | १९८१ जनगणना | १९८७-८८ एन.एस्.एस् ४३ वी फेरी |
|---|---|---|---|
| ४३ | ३४ | ३६.८ | ४०.९ |

**आधार :** इकॉनॉमीक अँड पोलीटीकल वीक्ली. १३ एप्रिल १९९१, पृ. ९७१

संबंधित वर्षातील लोकसंख्या लक्षात घेता १९६१ मध्ये १८.५३ कोटी, १९७१ साली १८.६३ कोटी, १९८१ साली २५.२१ कोटी, व १९८७-८८ साली २६.३३ कोटी अशी स्थूलमानाने श्रमिक संख्या होती. म्हणजेच १९६१ ते १९८७-८८ या काळात जवळजवळ ७.८६ कोटी इतकी श्रमिक संख्येत वाढ झाली आहे. १९९१ ची श्रमिक संख्या ३४.४४ कोटी इतकी असावी असा अंदाज आहे. हा एकूण कालखंड लक्षात घेता १९६१ ते १९९१ या काळात प्रत्येक दशकात लोकसंख्या २.४८%, २.५०% व २.२१% वार्षिक अशा वेगाने वाढली आहे. याच कालखंडात रोजगार मात्र साधारणपणे वार्षिक २% नी वाढला आहे. ग्रामीण रोजगार वार्षिक १.७५ टक्क्यानी वाढला तर नागरी रोजगार वार्षिक ४ टक्क्यानी वाढला आहे. पुरुषांच्या बाबतीत रोजगार वृध्दीचा दर २.१९% आहे तर स्त्रियांच्या बाबतीत तो २.२४% आहे. रोजगार वृध्दीचे दर तक्ता क्रं. २ मध्ये दिलेले आहेत.

तक्ता क्रं. २

**रोजगार वृध्दी दर ( वार्षिक % )**

| प्रदेश / लिंग | १९७२ - ७३ ते १९८७ - ८८ |
|---|---|
| ग्रामीण | १.७५ |
| नागरी | ४.०० |
| पुरुष | २.१९ |
| स्त्रिया | २.२४ |
| एकूण | २.२१ |

**आधार :** क्वार्टरली इकॉनॉमीक रिपोर्ट ऑफ द इंडियन इन्स्टीट्यूट ऑफ पब्लिक ओपिनीयनल जुलै- सप्टेंबर १९९० नं. १३१.

या ठिकाणी सतत प्रमुख आणि पूरक पध्दतीचा रोजगार दर्जा लक्षात घेतला आहे. १९७२-७३ ते १९८७-८८ या काळाचा विचार करता, १९७३-७८ मध्ये रोजगार वृध्दी दर २.८२% होता, १९७८-८३ या काळात तो २.२२% होता, तर १९८३ -८८ या काळात हा वृध्दीदर १.५५% असा दिसून येतो. म्हणजेच १९७२-८८ या काळात रोजगार वृध्दीचा वार्षिक दर हळूहळू घटत चाललेला दिसतो.

विविध क्षेत्रांचा विचार करता रोजगार वृध्दीचे दर संघटित व असंघटित क्षेत्रात तक्ता क्रं. ३ प्रमाणे दिसून येतात.

तक्ता क्रं. ३

**क्षेत्रवार रोजगार वृध्दी दर १९७३-८८ (% वार्षिक)**

| क्षेत्र | संघटित | असंघटित |
|---|---|---|
| शेती | १.३७ | १.६३ |
| खाण धंदे | ५.४७ | २.७८ |
| कारखानदारी | ३.६१ | १.४४ |
| बांधकाम | ७.२३ | ०.३७ |
| विद्युत, वायु व पाणी पुरवठा | ७.०६ | ३.३५ |
| वाहतूक, साठप व दळणवळण | ४.६५ | १.७० |
| सेवा | ३.०५ | २.७७ |
| एकूण | २.१७ | २.११ |

आधार : तक्ता क्रं. २ प्रमाणे (सतत प्रमुख व पूरक रोजगार स्थिती)

सर्वधारणपणे असे दिसून येते की संघटित क्षेत्रात झालेली रोजगारवृध्दी मुख्यत: सार्वजनिक क्षेत्रामुळे झाली आहे. कारण १९७३-८८ या काळात संघटित क्षेत्रातील एकूण रोजगार सरासरी २ टक्क्यानी वाढला आहे असे असले तरी सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार वृध्दी ३ टक्क्यानी आहे, तर खाजगी क्षेत्रातील रोजगार वृध्दी फक्त ०.५ टक्क्यानी झालेली दिसते. विशेष म्हणजे १९८३-८८ या काळात खाजगी संघटित क्षेत्रातील रोजगार वार्षिक ०.१८ टक्क्यानी घटलेला आहे व सार्वजनिक क्षेत्रातील रोजगार वार्षिक २.१३ टक्क्यानी वाढलेला आहे.

१९७७-७८ ते १९८७-८८ या काळात सुशिक्षितांच्या रोजगाराची वृध्दी ग्रामीण भागात ८.१ टक्क्यांनी तर शहरी भगात ७.१ टक्क्यानी व एकूण ७.५ टक्क्यानी झालेली दिसते. त्यातहि तुलनात्मक विचार करता स्त्रियांच्या रोजगाराची वाढ ९.७ टक्के वार्षिक तर पुरुषांच्या रोजगाराची वाढ ७.३% वार्षिक झालेली आढळते.

१९७२-७३ ते १९८७-८८ या काळात रोजगाराची क्षेत्रनिहाय रचना पुढीलप्रमाणे

बदललेली दिसते.

तक्ता क्रं. ४

क्षेत्रनिहाय % रोजगार

| क्षेत्र | १९७२-७३ | १९८७-८८ |
|---|---|---|
| शेती | ७४ | ६५.५ |
| खाणी | ०.४४ | ०.७० |
| कारखानदारी | ८.८ | १०.८ |
| विद्युत, वायु व पाणी पुरवठा | ०.२ | ०.३ |
| बांधकाम | १.८ | ३.७ |
| व्यापार | ५.० | ६.९ |
| वाहतूक | १.८ | २.५ |
| वित्तीय, विमा व्यावसायिक व स्थावर मालमत्ता व्यवहार | ०.५ | ०.८ |
| सामुदायिक, सामाजिक व व्यक्तिगत सेवा | ७.३ | ८.२ |

आधार : तक्ता क्रं. २ प्रमाणे

वरील तक्त्यावरुन हे स्पष्ट होते की रोजगाराच्या रचनेत शेतीचा हिस्सा कमी झाला आहे व बिगरशेती रोजगाराचा हिस्सा सर्वच बिगरशेती क्षेत्रांच्या बाबतीत थोड्या अधिक फरकाने वाढलेला आहे. तक्ता क्रं. ३ मधील आकडेवारी लक्षात घेता हे स्पष्ट होते की, सुक्षितांची रोजगारी तुलनात्मक दृष्ट्या मोठ्या व वाढत्या वेगाने वाढली आहे, विशेषत: स्त्रियांच्या बाबतीत. अलिकडच्या काळातील सुक्षितांची वाढती बेकारी लक्षात घेता रोजगाराची गरज असणारे सुशिक्षित अधिक वेगाने वाढले हे स्पष्ट होते. एकूण रोजगारामध्ये सर्वसाधारणपणे पुरुष स्त्री रोजगारीचे प्रमाण २:१ तर संघटित- असंघटित क्षेत्रातील रोजगारीचे प्रमाण १:९ असे दिसून येते. १९७३ ते १९८८ या काळात सार्वजनिक

क्षेत्रात ५० लाख रोजगार वाढला. तर याच काळात संघटित खाजगी क्षेत्रात फक्त ५ लाख इतकाच रोजगार वाढला.

रोजगाराची रचना एका वेगळ्या पध्दतीने लक्षात घेता येते.

**तक्ता क्रं. ५**

| रोजगारीची रचना | १९७३ | १९८८ |
|---|---|---|
| स्वयंरोजगार | ६१.४ | ५६.३ |
| नियमित वेतन रोजगार | १५.३ | १३.७ |
| नैमित्तीक वेतन रोजगार | २३.३ | २९.९ |

**आधार : तक्ता क्रं. २ प्रमाणे**

वरील तक्त्यावरुन हे स्पष्ट होते की स्वयंरोजगाराचे प्रमाण घटलेले आहे, नियमित रोजगाराचे प्रमाणहि घटलेले आहे. याउलट नैमित्तीक रोजगाराचे प्रमाण मात्र वाढलेले दिसते. नियमित वेतन रोजगारपैकी ४०% रोजगार सार्वजनिक क्षेत्रात आहे.

१९७२-८८ या काळात झालेली रोजगार वृध्दी व रोजगाराची रचना याचा थोडक्यात आढावा आपण वर घेतला आहे. योजनाबध्द आर्थिक विकासाच्या प्रयत्नात आपण सतत रोजगार वृध्दी करत गेलो आहोत हे स्पष्ट आहे. परंतु याच काळात एकूण श्रमिक शक्तीमध्ये मोठ्या प्रमाणात भर पडत गेल्यामुळे बेरोजगारी वाढत गेली तसेच बेरोजगारीची रचना अधिकाधिक क्लिष्ट होत गेली. १९७० नंतरच्या काळात रोजगार वाढीचा दर वार्षिक २% होता. पण तो बेराजगारीची थकबाकी आणि श्रमशक्तीत होणारी वाढ यांच्या तुलनेत कमी पडत होता, बेरोजगारीच्या वृध्दी दराबद्दल आणि रचनेबद्दल आकडेवारीचे विश्लेषण करण्यापूर्वी बेरोजगारी मोजण्याच्या काही संकल्पनांचे स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

१) सर्वसाधारण प्रमुख बेरोजगार स्थिती (usual principle status) :-

जेव्हा एखादी व्यक्ती कामासाठी उपलब्ध असते परंतु वर्षाच्या ५०% पेक्षा अधिक दिवस बेरोजगार रहावे लागते तेव्हा त्या बेरोजगारीस सर्वसाधारण प्रमुख बेरोजगार स्थिती असे नाव देतात.

२) साप्ताहिक बेरोजगार स्थिती (weekly status) :-

जेव्हा संदर्भ सप्ताहात कामासाठी उपलब्ध असूनदेखील एकहि तास रोजगार संबंधित व्यक्तीला मिळत नाही तेव्हा त्या बेरोजगारीस साप्ताहिक स्थिती बेरोजगारी असे नाव दिले जाते.

३) दैनिक स्थिती बेरोजगारी (Daily Status)

संदर्भ सप्ताहात श्रमशक्तीतील प्रत्येक व्यक्तीला किती दिवस बेरोजगार रहावे लागले त्या बेरोजगार

दिवसांच्या एकूण संख्येला दैनिक बेरोजगार स्थिती असे म्हणतात.

बेरोजगारीची एकूण व्याप्ती लक्षात घेण्याच्या दृष्टीने दैनिक स्थिती बेरोजगारीची आकडेवारी अधिक प्रभावी ठरते. तक्ता क्रं. ६ मध्ये या तिन्ही पध्दतीने ग्रामीण भाग, शहरी भाग तसेच स्त्री आणि पुरुष यांच्या बेरोजगारीचे प्रमाण दिले आहे. हे प्रमाण श्रम शक्तीच्या शेकडा असते.

तक्ता क्र. ६

**बेरोजगारीचे प्रमाण ( श्रमशक्तीशी शेकडा प्रमाण )**

| संकल्पना | ग्रामीणभाग | | शहरी भाग | | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्री | पुरुष | स्त्री | |
| सर्वसाधारण प्रमुख बेरोजगार स्थीती (UPS) | | | | | |
| १९७२-७३ | १.२ | ०.५ | ४.८ | ६.० | |
| १९८७-८८ | १.८ | २.४ | ५.२ | ६.२ | ३.७७ |
| साप्ताहिक स्थीती बेरोजगारी (WS) | | | | | |
| १९७२-७३ | ३.० | ५.५ | ६.० | ९.२ | |
| १९८७-८८ | ४.२ | ४.३ | ६.६ | ९.२ | ४.८० |
| दैनिक स्थिती बेराजगारी (DS) | | | | | |
| १९७२-७३ | ६.८ | ११.२ | ८.० | १३.७ | |
| १९८७-८८ | ४.६ | ६.७ | ८.८ | १२.० | ६.०९ |

**आधार** : इकॉनॉमीक अँड पोलिटीकल वीकली, १३ एप्रिल १९९१, पृ. ९७३ तक्ता क्रं. २ प्रमाणे पृष्ठ २७

सर्वसामान्य वाचकांच्या दृष्टीने बेरोजगारीचे श्रमशक्तीशी असलेले हे शेकडेवारी प्रमाण फारसे उपयुक्त ठरत नाही. त्यासाठी बेरोजगारी एकूण आकडेवारीचा विचार करणे आवश्यक ठरते. नियोजन मंडळाने सादर केलेल्या एका निबंधाप्रमाणे १९७२-७३ मध्ये बेरोजगारी थकबाकी ८० लाख होती. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संघटनेच्या ४३ व्या फेरीतील आकडेवारी प्रमाणे सर्वसाधारण प्रमुख बेरोजगारी स्थितीप्रमाणे १ कोटी

२४ लाख ३० हजार, साप्ताहिक बेरोजगारी स्थितीप्रमाणे १ कोटी ५३ लाख व दैनिक बेरोजगारी स्थितीप्रमाणे १ कोटी ८९ लाख ५० हजार इतके लोक बेरोजगार होते. या सर्व आकडेवारीचा विचार करता व साप्ताहिक बेरोजगारी स्थिती लक्षात घेता १९९० च्या अखेरीस १ कोटी ६० लाख लोक बेरोजगार होते व त्याचबरोबर १ कोटी २० लाख लोक फार मोठ्या प्रमाणात अपूर्ण रोजगारावर होते. म्हणजेच एकूण बेरोजगारांची संख्या १९९० साली २ कोटी ८० लाख ते २ कोटी ९० लाख इतकी मानावी लागते. १९९० ते १९९५ या काळात श्रमशक्तीमध्ये ३ कोटी ७० लाखाची भर पडणार आहे तर १९९५ ते २००० या काळात श्रमशक्तीमध्ये आणखी ४ कोटी १० लाखांची भर पडणार आहे. म्हणजेच १९९० ते ९५ या काळात ६ कोटी ५० लाख लोकांना रोजगार द्यावा लागेल. तर १९९० ते २००० या काळात १० कोटी ६० लाख लोकांना रोजगार द्यावा लागेल. १९९० मध्ये ३० कोटी लोकांना रोजगार मिळत होता. हे लक्षात घेता १९९५ अखेर सर्वांना रोजगार द्यायचा झाल्यास चक्रवाढीने ४% ने रोजगार वाढ झाली पाहिजे किंवा २००० सालापर्यंत सर्वांना रोजगार द्यायचा झाल्यास वार्षिक ३ टक्यांनी रोजगार वाढ झाली पाहिजे.

१९६१ ते १९८८ या काळात मॅट्रीक व पदवीपर्यंत शिक्षण झालेल्यांची संख्या कशी वाढली यांचे चित्र पुढील तक्त्यावरुन स्पष्ट होते.

तक्ता क्रं. ७

**मॅट्रीक व पदवीधरांची संख्या ( लाखात )**

| | मॅट्रीक | | | पदवीधर | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| वर्ष | पुरुष | स्त्रिया | एकूण | पुरुष | स्त्रिया | एकूण | |
| १९६१ | ७० | १३ | ८३ | १० | २ | १२ | ९५ लाख |
| १९८८ | ४५४ | १९८ | ६५२ | ११२ | ४६ | १५८ | ८ कोटी १० लाख |

**आधार :** इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकली,
१३ एप्रिल १९९१ पृ. ९७३

वरील तक्त्यातील आकडेवारीवरुन हे स्पष्ट होते की संबंधित कालखंडात सुशिक्षितांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे. या सुशिक्षितांच्यामध्ये असलेल्या बेरोजगारीचे प्रमाण तक्ता क्रं. ८ मध्ये दिले आहे.

तक्ता क्रं. ८

**सुशिक्षितांच्या बेरोजगारीचे प्रमाण (%)**

(१९८७-८८)

| शिक्षण पातळी | ग्रामीण भाग | | नागरी भाग | |
|---|---|---|---|---|
| | पुरुष | स्त्रिया | पुरुष | स्त्रिया |
| मॅट्रीक | ६.८ | २३.० | ७.४ | १७.० |
| पदवी व अधिकतर शिक्षण | १०.२ | ३०.४ | ६.७ | १८.७ |

**आधार : तक्ता क्रं. ७ प्रमाणे पृ. ९७४**

वरील तक्त्यावरुन पुढील गोष्टी स्पष्ट होतात.

१) ग्रामीण भागात मॅट्रिक किंवा उच्चतर शिक्षण घेतलेल्या पुरुषांच्या मध्ये स्त्रियांच्यापेक्षा कमी बेरोजगारी आहे.

२) ग्रामीण भागातील पुरुष व स्त्री पद्वीधरांच्या मध्ये मॅट्रीक शिक्षण झालेल्या पेक्षा अधिक प्रमाणात बेरोजगारी आहे.

३) शहरी भागात देखील सुशिक्षित पुरुषांच्या मध्ये स्त्रियांच्या पेक्षा बेरोजगारीचे प्रमाण कमी आहे. व मॅट्रीक शिक्षण झालेले तसेच पद्वी व पद्वीपेक्षा अधिक शिक्षण झालेले यांच्यातील बेरोजगारीचे प्रमाण जवळपास सारखेच आहे.

सुशिक्षितांची बेरोजगारी लक्षात घेत असताना सुशिक्षित मुख्यतः कोणत्या प्रकारच्या रोजगारात जास्त प्रमाणात आहेत हे पाहणे देखील उपयुक्त ठरते. १९८७-८८ मध्ये ग्रामीण पुरुषांच्या पैकी मॅट्रीक झालेल्यापैकी ४७.२% शेती क्षेत्रात व १४.७% विगरशेती क्षेत्रात स्वयंरोजगार करत होते. तसेच २८.५% बिगरशेती क्षेत्रात नियमित वेतन कामगार होते. तर ८.८% किरकोळ कामगार होते. हीच प्रमाणे पद्वीधरांच्या बाबतीत ३५.१%, १३.१%, ४८.८% आणि २.९% अशी आढळून येतात. ग्रामीण भागातील मॅट्रीक स्त्रियांच्या बाबतीत ५७.७% स्त्रिया स्वयंरोजगार करतात. ३५.१% स्त्रिया नियमित वेतन रोजगार करतात. तर ७.३% स्त्रिया किरकोळ वेतन रोजगार करतात. याउलट पद्वीधर ग्रामीण स्त्रियांच्या बावतीत ३३.८% स्वयंरोजगार, ६३.५% वेतन रोजगार आणि २.८% किरकोळ वेतन रोजगार करतात. शहरी भागात मॅट्रीक झालेले पुरुष

३७.६% स्वयंरोजगार, ५८.७% नियमित वेतन रोजगार व ३.७% किरकोळ वेतन रोजगार करतात. शहरी भागातील पदवीधर पुरुषांच्या पैकी २८.८% स्वयंरोजगार, ७०.६% नियमित वेतन रोजगार व ०.५% किरकोळ वेतन रोजगार करतात. याउलट शहरी भागातील मॅट्रीक स्त्रिया ३२.७% स्वयंरोजगार, ६४.७% नियमित वेतन रोजगार आणि २.५% किरकोळ वेतन रोजगार करतात. तर शहरी भागातील पदवीधर स्त्रियांच्यापैकी १४.२% स्वयंरोजगार, ८५.५% नियमित वेतन रोजगार व ०.३% किरकोळ वेतन रोजगार करतात.

**रोजगार प्रवण विकास नीती :**

१९७२-७३ ते १९७७-७८ या दरम्यान १ टक्क्यानी राष्ट्रीय उत्पादन वाढल्यास ०.६ टक्क्यानी रोजगार वाढत होता. १९७७ ते ८३ या काळात हे प्रमाण ०.५५ तर १९८३ ते ८८ या काळात हे प्रमाण ०.३८ झाले. या प्रमाणात बदल होत नाही असे गृहीत धरल्यास नजीकच्या भविष्य काळात (१९९५) पूर्ण रोजगार प्राप्त करण्यासाठी राष्ट्रीय उत्पादन १०.५ टक्क्यानी वार्षिक वाढले पाहीजे किंवा पूर्ण रोजगाराचे उद्दिष्ट सन २००० मध्ये साध्य करायचे झाल्यास राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा वेग किमान ८% वार्षिक असला पाहीजे. गेल्या दोन वर्षात नियोजन मंडळाच्या पातळीवर झालेल्या चर्चा लक्षात घेता, व सध्याची धोरणे लक्षात घेता या गोष्टी अशक्य वाटतात. पूर्ण रोजगाराचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नियोजन मंडळाच्या म्हणण्याप्रमाणे विकासाची रचना रोजगार निर्मितीशी सुसंगत अशी बनवावी लागेल. त्यासाठी

१) ज्या क्षेत्रामध्ये जास्त रोजगार निर्मिती क्षमता आहे अशाच क्षेत्रामध्ये जास्त विकास प्रयत्न झाला पाहिजे. अर्थात त्यातहि रोजगार निर्मिती जास्त करु शकणाऱ्या उद्योगांना प्राधान्य द्यावे लागेल. हे सर्व करत असताना एकूण मागणी आणि पुरवठा व व्यापार तोल यांच्या मर्यादा लक्षात घेणे आवश्यक आहे.

२) भांडवलाच्या प्रती एककामागे अधिक रोजगार निर्मिती करणाऱ्या उत्पादन तंत्रांचा वापर करणे आवश्यक आहे. अधिक भांडवल घनता असणाऱ्या उत्पादन तंत्रांचा सरसकट वापर करण्याच्या प्रवृत्तीवर मर्यादा घालणे गरजेचे आहे.

३) सार्वजनिक क्षेत्राची गुंतवणूक करताना देखील वरील निकषांचा वापर करणे आवश्यक आहे. त्याच वळणावर खाजगी गुंतवणूक होण्यासाठी राजकोषीय आणि मौद्रिक धोरणांचा वापर करणे आवश्यक आहे.

वरील निकषांचा विचार करता शेती विभागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती करणे आवश्यक ठरते. दुर्दैवाने शेतीची सर्व साधारण रोजगार निर्मिती क्षमता कमी आहे आणि शेतीतील रोजगार उत्पादन

गुणांतर कमी होत गेलेले दिसते. तथापि जलसिंचन सोयींची वाढ केल्यास दर हेक्टरी रोजगार निर्मिती वाढू शकते असा अनुभव आहे. याउलट प्रती हेक्टर उत्पादकता वाढी बरोबर काही ठिकाणी रोजगार निर्मिती वाढते परंतु सर्वसाधारणपणे ती घटते असा अनुभव आहे. त्याचबरोबर हेहि लक्षात घेणे आवश्यक आहे की, १ टक्क्याने जलसिंचन क्षमता वाढल्यास ०.३८ टक्क्यानी रोजगार निर्मिती वाढते. असा अनुभव आहे. आंध्र प्रदेश, ओरिसा आणि कर्नाटक राज्यातील क्षेत्र अभ्यासावरुन असे आढळून आले आहे की, जिरायत जमिनीच्या तुलनेने बागायत जमिनीमध्ये ५०% ते १५०% इतकी अधिक रोजगार निर्मिती होते. या गोष्टी लक्षात घेता शेती क्षेत्रात जलसिंचन सोयी वाढवणे हा रोजगार निर्मितीचा एक प्रमुख मार्ग ठरतो. भाजीपाला आणि फळफळाव यांच्या शेतीला प्रोत्साहन दिल्यास अधिक रोजगार निर्मिती होईल असे मत व्यक्त केले जाते. याच्याच जोडीला पशुपालन आणि दुग्ध व्यवसाय या क्षेत्रातहि रोजगार निर्मिती मोठ्या प्रमाणात होवू शकते.

अर्थात ग्रामीण भागात देखील बिगरशेती उत्पादन १९७२-७३ मध्ये १४% रोजगार देत होते. ते १९८८ मध्ये २२% रोजगार देवू लागले. हे लक्षात घेता कुटिरोद्योग, लघुद्योग यांनाहि निवडक पध्दतीने प्रोत्साहन देणेची गरज दिसते. कारण कारखानदारीत निर्माण होणाऱ्या उत्पादन मूल्यापैकी ४२% हिस्सा ग्रामीण आणि लघुद्योगांचा आहे व त्यातून ८०% औद्योगिक रोजगार निर्माण होतो.

नियोजन मंडळाच्या अलिकडील अभ्यासाप्रमाणे अधिक प्रमाणात रोजगार निर्मिती व अल्प सीमांत भांडवल उत्पादन गुणोत्तर असणारे उद्योग पुढीलप्रमाणे आहेत.- मासे डबाबंद करणे, बेकरी, साखर आणि खांडसरी, तंबाखू उत्पादने, कापूस पिंजणे, स्वच्छ करणे, छपाई आणि रंगकाम, हातमाग, यंत्रमाग, इ. याचबरोबर बांधकाम क्षेत्राची रोजगार निर्मिती क्षमता मोठी आहे हे लक्षात घेवून आर्थिक, सामाजिक, परिसेवांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने व गृहनिर्माण योजना वाढवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची गरज आहे. ग्रामीण भागासाठी शिक्षण, आरोग्य या अत्यावश्यक सामाजिक सेवा किमान पुरेशा प्रमाणात देण्याचा प्रयत्न केला तरी जवळजवळ ३ लाख शिक्षक, २.६ लाख वैद्यकीय कर्मचारी आणि १० हजार डॉक्टर्स इतक्या लोकांना रोजगार मिळू शकेल.

# ( ब ) रोजगाराचा हक्क

. वरील विवेचनावरुन काही गोष्टी स्पष्ट होतात एक म्हणजे लोकसंख्या आणि श्रमशक्तीच्या मोठ्या वाढीमुळे प्रयत्नांची शिकस्त करुन देखील बेरोजगारीचा प्रश्न सोडवता आला नाही. उलट बेरोजगारीचे प्रमाण आणि गुंतागुंत वाढतच गेलेली आहे. गेल्या २०-२५ वर्षात सरकारने रोजगार वृध्दीसाठी अल्पभूधारक विकास योजना (SFDA), सीमांत शेतकरी व शेतमजूर विकास योजना (MFAL) एकात्मिक ग्रामीण रोजगार योजना (IRDP), राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (NRDP), ग्रामीण भूमीहीन रोजगार हमी योजना (RLEGP) अगदी अलिकडे जवाहर रोजगार योजना (JEP) यासारख्या योजना व्यापक प्रमाणात मोठा खर्च करुन राबवल्या आहेत. या सर्व योजनात स्वयंरोजगार वृध्दीला अधिक प्राधान्य दिलेले दिसते. ते फारसे योग्य नाही अशा प्रकारची भूमिका काही तज्ञानी मांडली आहे. (पागे, दांडेकर,रथ) रोजगार निर्मितीसाठी केली जाणारी गुंतवणूक वेतन रोजगार निर्मितीवरच अधिक प्रमाणात खर्च केली जावी असे मत अलिकडे अधिक प्रकर्षाने मांडले जाते. कारण वर मांडलेल्या बहुसंख्य योजनांच्या बाबतीत गळतीचे प्रमाण फार मोठे आहे असा अनुभव येतो. तुलनात्मक दृष्ट्या महाराष्ट्र शासनाने राबविलेली रोजगार हमी योजना अधिक उपयुक्त ठरलेली आहे. कारण या योजनेत वेतन रोजगार निर्मितीला अधिक प्राधान्य आहे. बेरोजगारीच्या आकडेवारीचा अद्यावत संदर्भ घेता १९९० ला २ कोटी ९० लाख बेरोजगार शिल्लक होते, १९९० ते १९९५ या काळात श्रमशक्तीची ३ कोटी ७० लाखांनी वाढ होणार आहे व १९९५-२००० या पुढच्या पाच वर्षात ४ कोटी १० लाख इतकी श्रमशक्ती वाढणार आहे. हे आपण यापूर्वीच पाहीले आहे. म्हणजेच येत्या दहा वर्षात, वर्षाला १ कोटी ७ लाख नवे रोजगार निर्माण करावे लागतील. तसे करण्यासाठी रोजगार वृध्दीचा वार्षिक दर ३ ते ४% तर राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा दर ८ ते १०% इतका असावा लागेल. अनुभव लक्षात घेता या दोन्ही गोष्टी सध्याच्या धोरणरचनेत अशक्य आहेत असे कोणीही मान्य करेल. या पार्वभूमीवर रोजगाराचा हक्क व त्याच्या अर्थपूर्ण कार्यवाहीसाठी प्रयत्न केल्यास कोणते प्रश्न निर्माण होतील यांची चर्चा करणे आवश्यक ठरते. कारण बेरोजगारी निर्मूलन हाच व्यक्तीच्या पातळीवरुन विकासाचा खरा अर्थ मानावा लागेल.

नवव्या लोकसभेसाठी सार्वत्रिक निवडणूक जाहीर झाल्यानंतर राष्ट्रीय आघाडीने

२१ ऑक्टोंवर रोजी जाहीर केलेल्या आपल्या निवडणूक जाहीरनाम्यामध्ये भारतीय नागरीकांना रोजगाराचा हक्क देऊ असे जाहीर केले. त्यांची शब्दरचना पुढीलप्रमाणे देता येईल, 'प्रत्येक नागरीकाला अर्थपूर्ण आणि सन्मानपूर्वक जीवन जगता यावे यासाठी उत्पादक आणि उत्पन्नदायी रोजगाराचा हक्क देण्याचा प्रयत्न केला जाईल.' त्यासाठी आवश्यक तर घटना दुरुस्ती करुन रोजगाराचा हक्क मूलभूत हक्कामध्ये समाविष्ट करण्याची घोषणा सरकारने २ जानेवारी १९९० ला केली. १९४८ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने (UN) मानवी हक्कांच्या जागतिक जाहिरनाम्यात रोजगार हक्काचा समावेश केलेला आहे. (कलम २३(१) या कलमाप्रमाणे नागरीकाला रोजगाराचा हक्क असला पाहिजे, रोजगाराच्या निवडीचा हक्क असला पाहिजे, रोजगाराची परिस्थिती न्याय्य व अनुकूल असण्याचा हक्क असला पाहिजे आणि बेरोजगारीच्या काळात संबंधिताला बेरोजगारभत्याचा हक्क असला पाहिजे, इतक्या घटकांचा समावेश रोजगार हक्क या संकल्पनेत करण्यात आला. हा जाहीरनामा तयार करण्याच्या कामात भारत सरकारने प्रातिनिधिक भाग घेतला होता. आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या ज्या आमसभेत या जाहीरनाम्याला मान्यता देण्यात आली त्याचे अध्यक्ष भारतीय प्रतिनिधी होते. याच काळात भारताची राज्यघटना तयार होत होती, आणि म्हणूनच रोजगाराच्या हक्काचा समावेश भारतीय राज्यघटनेत करण्याची घटनाकारांची व सध्या सरकारची नैतिक जबाबदारी आहे असे मत डॉ. आदिशेषय्या यांनी व्यक्त केले आहे. १९४६ च्या भांडवलशाही जपानच्या राज्यघटनेत कलम २६ प्रमाणे रोजगाराचा हक्क मूलभूत हक्क आहे. सोवियत रशियाच्या १९७७ च्या राज्यघटनेतील कलम ४० मध्ये रोजगार हमीच्या हक्काचा उल्लेख आहे. पण त्यामध्ये प्रत्येक नागरीकाला रोजगारासाठी योग्य बनविणे एवढाच अर्थ अभिप्रेत आहे असे स्पष्टीकरण प्रा. वि. म. दांडेकर यांनी केलेले आहे परंतु १९५१ च्या रशियन घटनेमध्ये १० व्या प्रकरणांतील कलम ११८ प्रमाणे सोवियत नागरीकांना रोजगाराचा हक्क आहे म्हणजेच रोजगार हमी आणि कामाच्या गुणवत्ता व प्रमाणाप्रमाणे मोबदल्याचा हक्क आहे असे स्पष्टपणाने म्हटले आहे. (citizens of the U.S.S.R. have the right to work, that is the right to garanteed exployment & payment for their work in acordance with its quantity & quality) एवढेच नव्हे तर या घटनेतील कलम ११९ प्रमाणे सोवियत नागरीकांना विश्रांतीचा व विरंगुळ्याचा हक्क तसेच कलम १२० प्रमाणे वृध्दापकाळात निर्वाहाचा हक्क कलम १२१ प्रमाणे शिक्षणाचा हक्क (प्राथमिक) आणि स्त्री-पुरुष समानतेचा हक्क मान्य केलेले आहेत. लिओनिट डॅनिलोव यांच्या Soviet Five Year Plans (1980) या पुस्तिकेमध्ये तर

असा स्पष्ट उल्लेख आहे की रोजगाराचा हक्क हा मानवाच्या मूलभूत हक्कामध्ये असलाच पाहिजे. १९२८ मध्ये सोवियत रशियामध्ये १७,२०००० बेरोजगार होते व बहुतेक शहरात रोजगार विनिमय केंद्रे होती. डॅनिलेव यांच्या मते १ ऑक्टोबर १९३० नंतरच्या ५० वर्षात सोवियत रशियात एकही बेरोजगार कोणत्याही दिवशी अस्तित्वात नव्हता. रोजगार विनिमय केंद्रे बंद करण्यात आली होती आणि मोठ्या प्रमाणात तांत्रिक सुधारणा अंमलात आणूनदेखील बेरोजगार होणाऱ्या प्रत्येक व्यक्तिला इतर क्षेत्रात - (नव्याने अस्तित्वात येणाऱ्या जुन्या प्रकारच्या उद्योगसंस्था व नव्या उत्पादनतंत्राने निर्माण होणाऱ्या नव्या उद्योगसंस्था यामध्ये) तात्काळ रोजगार उपलब्ध होत होता.

सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की, बहुतेक प्रमुख राष्ट्रांच्या राज्यघटनामध्ये नागरिकांना रोजगाराच्या हक्काची हमी तत्वतः देण्यात आली आहे. परंतु प्रत्यक्षात या तरतुदींचे स्वरुप सामाजिक सुरक्षा आणि बेरोजगारी विमा या योजनांच्या कार्यवाहीत व्यक्त होते. प्रत्येकाला प्रत्येकाच्या इच्छेप्रमाणे, क्षमतेप्रमाणे काम निर्माण करुन पुरविणे या अर्थाने रोजगाराचा हक्क कोणत्याच राष्ट्रात पूर्णतः दिला असेल असे वाटत नाही.

**भारतीय घटनेतील तरतुदी :**

भारतीय घटनेमध्ये रोजगाराचा हक्क मूलभूत हक्कामध्ये समावेश केलेला नाही. तसा तो करावा अशी मागणी वेळोवेळी विविध राजकीय पक्ष, तज्ञ, कामगार नेते व इतरांनी केलेली आहेत. १९७८-७९ मध्ये लोकसभेच्या अंदाज संमितीच्या अहवालात अधिकृतपणे रोजगाराचा हक्क मूलभूत हक्कामध्ये समाविष्ट करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

भारतीय राज्यघटनेतील या संबंधातील तरतुदी मूलभूत हक्कामध्ये घातलेल्या नाहीत. त्यांचा समावेश शासनसंस्थेच्या धोरणात्मक मार्गदर्शक तत्वामध्ये केलेला आहे. या बाबतीत भारतीय राज्यघटनेतील कलम ३९, ४१ आणि ४३ यांची माहिती असणे आवश्यक आहे. ही कलमे पुढीलप्रमाणे आहेत. •

(ही भाषांतरे वि. म. दांडेकर यांच्या "पूर्ण रोजगार : नवीन नियोजन आयोगाचा दृष्टीकोन" या प्रा. रविंद्र दोशी यांनी शब्दांकन केलेल्या व "अर्थसंवाद" ४ मार्च १९९१ च्या अंकात प्रकाशित झालेल्या लेखातून घेतलेली आहेत.)

**कलम ३९** - (अ) स्त्री आणि पुरुष नागरीकांना उपजिविकेसाठी पुरेशी साधने मिळविण्याचा सारखाच हक्क आहे; याच्या पूर्तीसाठी शासनसंस्थेने आपले धोरण राबविले पाहिजे."

**कलम ४१** - "रोजगार, शिक्षण, आणि बेकारी, वृध्दत्व, आजारपण, अपंगत्व आणि इतर प्रतिकूल गरजांकरीता सार्वजनिक हक्क मिळवून देण्यासाठी शासनसंस्थेने

आपल्या आर्थिक कुवतीनुसार पुरेशी तरतूद केली पाहिजे."

**कलम ४३** - "कायदेकरुन अथवा आर्थिक संघटना स्थापन करुन अथवा इतर कोणत्याही मार्गाने सर्व शेतमजूर, औद्योगिक कामगार आणि इतर कामगारांना काम, जीवनावश्यक वेतन, चांगले जीवनमान जगता येऊन फुरसतीच्या वेळेचा तसेच सामाजिक व सांस्कृतिक संधीचा पूर्ण उपयोग करता येईल अशी रोजगाराची परिस्थिती उपलब्ध करुन दिली पाहिजे. शासनसंस्थेने ग्रामीण भागात व्यक्तिगत अथवा सहकारी पध्दतीने कुटीरोद्योगांना प्रोत्साहन देण्याचा विशेष प्रयत्न केला पाहिजे."

वरील तरतुदी लक्षात घेता घटना लिहीणाऱ्यांनी रोजगारीच्या प्रश्नाचा साकल्याने विचार केला होता असे स्पष्ट होते. अर्थात प्रत्येक नागरिकाला रोजगार उपलब्ध करुन देण्याची सरकारची जबाबदारी सरकारच्या आर्थिक कुवतीच्या मर्यादेतच लक्षात घ्यावी असे भारतीय घटनेच्या तरतुदीतून व्यक्त होते. रशियन घटनेतील (१९७७) तरतूद लक्षात घेता प्रत्येक व्यक्तीला रोजगारासाठी योग्य बनविणे असा अर्थ रोजगारहमीच्या हक्काचा केलेला आहे, शासनाच्या आर्थिक क्षमतेचा विचार न करता प्रत्येक बेरोजगार व्यक्तीला शासनाने रोजगार दिला पाहिजे असा अर्थ होत नाही हे सूचित केले जाते. वेगळ्या शब्दात असे म्हणता येईल की सरकारने आर्थिक कुवत मर्यादित आहे या कारणासाठी रोजगार हमीचा हक्क नागरीकांना देण्यामध्ये चालढकल केली. टाळाटाळ केली तर ते घटनात्मक तरतुदींशी विसंगत ठरत नाही. आमच्या मते रोजगार हमीचा हक्क असा मर्यादीत करणे म्हणजे एका अर्थाने रोजगार हमीचा हक्क नाकारणे असाच निष्कर्ष निघतो. रशियातील अलिकडची बदलेली परिस्थिती व समाजवादाचा त्याग केलेली राजनिती हा रोजगाराच्या मूलभूत हक्काचा परिणाम नसून उलट ती बेरोजगारीचे कारण ठरतं आहे हे लक्षात घेता रोजगाराचा हक्क सर्वच राष्ट्रामध्ये (समाजवादी, भांडवलशाही, मित्र) घटनेच्या मूलभूत हक्कामध्ये समाविष्ट करणे अपरिहार्य, आवश्यक आहे. हे आता सर्वांनाच मान्य करावे लागेल. भारताच्या घटनेतील रोजगारासंबंधीच्या उपरिनिर्दिष्ट तरतुदी लक्षात घेता, कोणत्याहि बेरोजगार व्यक्तीला रोजगार मिळाला नाही म्हणून केंद्र सरकार किंवा राज्यसरकारला न्यायालयात खेचता येत नाही. साहजिकच बेरोजगार व्यक्तीला नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी शासनावर राहत नाही. तसेच बेरोजगार लोकांना रोजगार देता येत नसेल तर व्यापक, सर्वस्पर्शी व परिपूर्ण सामाजिक सुरक्षा व्यवस्था राबविण्याची जबाबदारीहि सरकारवर पडू शकत नाही. असाच व्यावहारिक अर्थ सध्याच्या रोजगार विषयक घटनात्मक तरतुदींचा होतो.

याउलट रोजगार हमीचा हक्क घटनेतील मूलभूत हक्कामध्ये समाविष्ट केल्यास त्या हक्काची न्यायप्रविष्टता मान्य होईल. रोजगार न मिळणारी कोणतीहि

व्यक्ती सरकारला न्यायालयात खेचू शकेल व नुकसान भरपाई मागू शकेल अर्थात तसे केल्यास, ते सरकारला झेपेल किंवा नाही, तसे करणे सामाजिक, राजकीय व आर्थिकदृष्ट्या योग्य ठरेल कां? योग्य ठरल्यास प्रत्यक्ष कार्यवाहीच्या दृष्टीने ते शक्य होईल कां, या सारख्या सर्व प्रश्नांची चिकित्सा होणे आवश्यक आहे व संबंधित सर्व चिकित्सा सर्वसामान्य माणसापर्यंत पोचविणे धोरणाची रचना व्यावहारिक होण्यासाठी आवश्यक, आत्यंतिक गरजेचे आहे.

सुरुवातीलाच स्पष्ट केल्याप्रमाणे आधुनिक समाजरचना लक्षात घेता, सुसंस्कृत शांततापूर्ण, संघर्षरहित व समाधानी समाज प्रस्थापित करणे हे स्वीकृत उद्दिष्ट लक्षात घेता, रोजगाराचा हक्क मूलभूत हक्कात समाविष्ट करणे आता सामाजिक व राजकीय दृष्ट्या किमान आवश्यक अट मानावी लागेल. व्यावहारिक म्हणजेच मुख्यत: आर्थिक दृष्ट्या हे परवडेल किंवा नाही याबाबत मतभेद आहेत. प्रा. वि. म. दांडेकर यांच्या मते रोजगाराचा हक्क घटनेच्या मूलभूत हक्कामध्ये समाविष्ट करणे व्यावहारिक दृष्ट्या शक्य होणार नाही कारण त्यामुळे पडणारा आर्थिक बोजा शासनाच्या कुवतीबाहेरचा असेल. यासंबंधात आकडेवारीचे विवेचन पुढे केलेले आहे. आमच्यामते मतदानाचा हक्क किंवा स्वातंत्र्याचा हक्क जितका मूलभूत हक्क आहे तितकाच मूलभूत रोजगाराचा हक्क आहे. विशेषत: ज्या समाजरचनेत उत्पादनाच्या भौतिक साधन सामुग्रीची मालकी अत्यंत विषम वाटलेली असते. व ज्यांच्याकडे जगण्यासाठी तात्कालिक श्रमाशिवाय दुसरे काही विकता येऊ शकत नाही अशा लोकांची संख्या लोकसख्येच्या ३० ते ४० टक्के असते. अशा समाजात रोजगाराचा हक्क मूलभूत हक्क असणे हेहि आता सुसंघटित समाजरचनेचे अंभूत व्यवच्छेदक लक्षण मानावे लागेल. त्यामध्ये कोणत्याही शासनाला निवडीचा अधिकारच असू शकत नाही. रोजगाराच्या हक्काची कार्यवाही करण्यासाठी साधन सामुग्री कशी निर्माण करायची हा वेगळा स्वतंत्र विषय आहे.. त्याची सोडवणूक करता येणार नाही हा एक गैरसमज आहे. अर्थात रोजगाराचा हक्क मूलभूत हक्कात समाविष्ट करताना "रोजगाराचा हक्क" या संकल्पनेचा नेमका अर्थ स्पष्ट करणे अत्यंत महत्वाचे आहे. या बावतीत पुढील गोष्टी सहजपणे लक्षात घेणे आवश्यक आहे.

रोजगाराच्या हक्कामध्ये रोजगार निवडीचा समाविष्ट करणे अशक्य आहे. भारत सरकारची भूमिकाहि तशीच आहे. रोजगार हक्काचा समावेश मूलभूत हक्कात करायचा झाल्यास त्यात रोजगार निवडीचा हक्क समाविष्ट होत नाही. असे स्पष्ट करणे गरजेचे आहे. रोजगार हक्काच्या छत्राखाली प्रत्येक बेरोजगार व्यक्तीला शासनाकडे उपलब्ध असणारे काम करावेच लागेल. दिलेल्या कामास नकार दिल्यास त्या व्यक्तीस शासनाकडून बेरोजगारीसाठी नुकसान भरपाई म्हणजेच बेरोजगार भत्ता मिळविण्याचा हक्क राहणार नाही. प्रा. दांडेकर यांच्या

म्हणण्याप्रमाणे रोजगार निवडीच्या हक्काला समाजाच्या गरजांचे बंधन असले पाहिजे. म्हणजेच निवडलेला रोजगार समाजाच्या उपयोगाचा असला पाहिजे हा अर्थातच उपलब्ध रोजगार संधीतून कोणता रोजगार निवडायचा याचा व्यक्तीगत निर्णय घेताना आवश्यक ठरणारा विचार आहे. परंतु बेरोजगारांना हक्कापोटी रोजगार देताना शासन बेरोजगार व्यक्तीच्या कौशल्याचा, अनुभवाचा विचार करुन उपलब्ध रोजगारातून संबंधित व्यक्तीस कोणता रोजगार द्यावा याचा विचार करु शकेल किंवा अशा बेरोजगार लोकांना मर्यादित रोजगार निवड हक्क देण्याचा विचार करता येईल. रोजगार हक्काच्या संदर्भात अमर्यादित रोजगार निवडीचा हक्क उपलब्ध करुन देणे कोणत्याहि समाज व्यवस्थेस शक्य होणार नाही. निवडलेला रोजगार समाजाच्या उपयोगाचा असला पाहिजे. या गोष्टीची दखल सोवियत युनियनच्या १९७७ च्या राज्यघटनेच्या ४० व्या कलमात घेतलेली आहे. एवढेच नव्हे तर कलम ६० प्रमाणे निवडलेल्या व समाजोपयोगी व्यवसायात शिस्तबध्द व काळजीपूर्वक काम करणे हे व्यक्तीवर बंधनकारक असते असेहि स्पष्ट केले आहे.

पुढचा महत्वाचा प्रश्न वेतनदराचा निर्माण होतो. रोजगाराचा हक्क निवडीच्या हक्कासहित दिल्यास संबंधित कामासाठी कामगाराला किती वेतन द्यावे हाहि प्रश्न महत्वाचा ठरतो. या बाबतीत रशियाच्या १९५२ व १९७७ च्या घटनेतील (अनुक्रमे क. ११८ व क. ४० प्रमाणे) तरतुदी प्रमाणे कामाचे प्रमाण व गुणवत्ता या आधारे वेतन ठरवावे असे सुचविले आहे. परंतु विशिष्ट गुणवत्तेच्या विशिष्ट परिणामाला किती मोबदला द्यायचा हे रशियाच्या घटनेत देखील स्पष्ट केलेले नव्हते. भारतीय राज्यघटनेत कामाचे परिमाण आणि गुणवत्ता यांचा कोणताच संदर्भ नाही. परंतु कलम ३९ प्रमाणे "जगण्यासाठी पुरेशी साधने" तर कलम ४३ प्रमाणे "जीवनावश्यक वेतन" अशा स्वरुपात वेतनाचा संदर्भ देण्यात आला आहे. वेगळ्या शब्दात असे म्हणता येईल की रोजगाराचा हक्क गृहीत धरता ज्या बेरोजगाराला रोजगार हमी किंवा हक्काखाली सरकार मार्फत रोजगार दिला जाईल त्याला तात्कालीन परिस्थितीशी सुसंगत असे किमान वेतन द्यावेच लागेल. कामाचे स्वरुप काय आहे याचा विचार त्या बाबतीत करता येणार नाही. अर्थात गुणवत्तेचा प्रश्न आणखी गुंतागुंतीचा आहे. म्हणजेच रोजगार हक्काच्या संरक्षणाखाली काम देत असताना असाच रोजगार निर्माण करावा लागेल की ज्यामध्ये गुणवत्तेचा निकष फारसे महत्व बाळगत नाही. (उदा. दगड काढणे, खडी फोडणे, विहीर काढणे, दगड रचणे, रस्ते बांधणे)

रोजगाराच्या हक्काचा विचार करताना संबंधित लोकांना रोजगार कोठे द्यावा हाहि एक अत्यंत महत्वाचा प्रश्न ठरतो. भारतीय नियोजन मंडळाच्या

विचाराप्रमाणे व सध्याची परिस्थिती लक्षात घेता, "रोजगाराची हमी अशी असावी की, काम प्रत्येकाच्या घराजवळ आणि शेतातील कामाइतकेच सोईस्कर असावे. मात्र मजुराला किमान वेतन कायद्यानुसार इतके वेतन मिळावे की जे त्याला शेतीमध्ये मिळत नाही आणि अल्प व अत्यल्प भूधारकांना स्वतःच्या शेतात काम करुनही मिळत नाही." यातील वेतनासंबंधिचा विचार आपल्या विवेचनाशी फारसा विसंगत नाही. पण प्रत्येकाला घराजवळ, शेतीतील कामाइतकेच सोईस्कर काम " हा विचार अल्पकाळात जरी सोईचा असला तरी अशा प्रकारचे " शिथील आणि सुलभ " काम कायम स्वरुपात देणे शक्य नाही. अर्थात या बाबतीतल जिथे काम तिथे कामगार नेणे का कागारांकडे कामे नेणे यापैकी कोणता पर्याय निवडावा हे ठरविणे आवश्यक होते. जेव्हा स्थानिक क्षेत्रात कोणत्याहि प्रकारचे किमान उत्पादक काम निर्माण करणे शक्य होत नाही तेव्हा संबंधिताना बेरोजगार भत्ता द्यावा का जेथे काम आहे तेथे कामगारांना नेणे-आणणे करुन त्यांना रोजगार द्यावा हाहि एक महत्वाचा प्रश्न ठरतो. या ठिकाणी असे सुचवावे वाटते की बेरोजगार भत्ता जेवढा वाहतूक व संलग्न खर्च भागवू शकतो तेवढ्या अंतरापर्यंत तरी कामाच्या हक्कासाठी घर/गाव सोडावे लागणे आवश्यक करावे. त्याहि मर्यादेत रोजगार देता आला नाही तर अधिक अंतरावर जावून किमान किंवा बाजार वेतनाचा रोजगार करायचा का असे अल्प अशा बेरोजगार भत्त्यावर समाधान मानायचे याचा निर्णय संबंधित व्यक्तीवर सोडावा. या गोष्टींचा विचार न केल्यास रोजगार हमी योजनेच्या अनुभवाप्रमाणे, अशा कामांचे नियोजन आणि कार्यवाही स्थानिक संस्थांकडे असल्याने कामे चोख करुन घेण्याऐवजी मजुरांना खूष ठेवण्याकडेच प्रवृत्ती राहणार. परिणामी माणसे शेतीच्या कामाऐवजी हमी कामाकडे वळण्याचा संभव अधिक आहे. खरे तर प्रत्येक स्थानिक क्षेत्रात प्रत्येकाला कायमस्वरुपी हमी काम देता येणे अशक्य आहे. ते देता आले नाही तर किमान वेतनाच्या एक तृतियांश किंवा प्रतिदिन रु. ५ यापैकी अधिक असेल ती रक्कम बेकारभत्ता म्हणून देण्याचा प्रस्ताव आहे. हा प्रस्ताव लक्षात घेता, कामे काढणे, ती करवून घेणे यापेक्षा बेरोजगार भत्ता वाटणे अधिक सोईचे होईल. असे होण्यामध्ये विकास प्रक्रिया व अर्थव्यवस्था यांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.

वरील सर्व विवेचनावरुन काही गोष्टी स्पष्ट होतात. त्या पुढील प्रमाणे मांडता येतील.

१) रोजगाराचा हक्क घटनेच्या मूलभूत हक्कामध्ये समाविष्ट करणे अपरिहार्य आहे. कारण रोजगाराचा हक्क हा आधुनिक, कल्याणकारी समाजरचनेच्या किमान सुसंस्कृतपणाचा प्राथमिक दर्शक मानला पाहिजे अशी आजची परिस्थिती आहे.

२) अर्थात रोजगार हक्कामध्ये निरपेक्ष पध्दतीने रोजगार निवडीच्या हक्काचा समावेश करता येणार नाही. एका मर्यादेपलिकडे, प्रत्येकाला बेरोजगारीच्या परिस्थितीत, शासनाकडून उपलब्ध करुन देता आलेले कामच स्वीकारावे लागेल.

३) रोजगार हमी योजनेमधील कामाचे परिमाण वस्तूरुप व वेळेच्या माध्यमात मोजावे लागेल. अशा कामाचे मोजमाप गुणवत्तेच्या निकषावर करता येणार नाही. तसे ते शक्य असले तरी करु नये. कारण..

४) अशा रोजगार हमी योजनावरील कामासाठी किमान वेतन कायद्याला मान्य असलेला वेतनदर (Minimum Wage) म्हणजेच "जगण्यासाठी पुरेशी साधने" दिले जावे.

५) शक्यतो, रोजगार हमी खाली देण्यात येणारी कामे शक्यतो स्थानिक परिसरातच, शेतीतील कामासारखी सोईस्कर दिली जावीत. तथापि आवश्यकता पडल्यास, जेवढे अंतर कामगारांना आणण्या-नेण्यासाठी येणारा खर्च नुकसान भरपाई इतका किंवा त्यापेक्षा कमी असल्यास, बेरोजगारांना बेरोजगार भत्ता देण्याऐवजी तेवढ्या अंतरावर काम उपलब्ध करुन देणे शक्य असल्यास ते अधिक योग्य ठरेल.

# (क.) प्रत्यक्ष कार्यवाही

निबंधाच्या प्रारंभी बेरोजगारीची जी आकडेवारी दिली आहे ती लक्षात घेता, २००० सालापर्यंत जवळजवळ पूर्ण रोजगाराचे उद्दिष्ट साध्य करायचे झाल्यास रोजगार वृध्दीचा दर वार्षिक ३ टक्के ठेवावा लागेल. सध्याच्या बदलेल्या आर्थिक धोरणाच्या संदर्भात, म्हणजेच खाजगीकरण, आंतरराष्ट्रीयीकरण, तांत्रिक आधुनिकीकरण, बहुराष्ट्रीय कंपन्यांना देशात गुंतवणूक करण्यास प्रोत्साहन व बाजारयंत्रणेवर अधिक भर , सार्वजनिक क्षेत्राचा संकोच इ. धोरणे बेरोजगारी वाढण्याची शक्यता आहे. परिणामतः पूर्ण रोजगाराचे उद्दिष्ट २००० सालापर्यंत साध्य करण्यासाठी रोजगार वृध्दीचा दर वार्षिक ३ टक्क्यापेक्षा जास्त ठेवावा लागेल.

बदललेल्या परिस्थितीत, रोजगाराचा हक्क घटनेच्या मूलभूत हक्कामध्ये घालण्यास काहीसा विरोध होण्याची शक्यता आहे. उलट, रोजगाराचा हक्क मूलभूत हक्कामध्ये घालणे अपरिहार्य आहे हे मान्य केल्यास (तसा तो करावा लागेल.) केंद्र सरकारपासून लहानात लहान खेड्यापर्यंत रोजगारासाठी मागणी व दबावगट यांना प्रशासन व्यवस्थेला फार मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागेल.

भारतातील बेरोजगारी व अपूर्ण रोजगाराची गुंतागुंत आणि त्यामधील

प्रादेशिक विविधता लक्षात घेता रोजगाराचा हक्क अर्थपूर्ण करण्यासाठी रोजगार कार्यक्रमांचे स्थानिक नियोजन व विकेंद्रित कार्यवाही आवश्यकता ठरते. त्यासाठी ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, तालुका पंचायत, आणि जिल्हा परिषदा ही व्यवस्था अत्यंत कार्यक्षम करावी लागेल. विशेषतः नियोजन तंत्राची आणि तांत्रिक सेवांची व्यापक उपलब्धता करावी लागेल. रोजगार हमी कार्यक्रम स्थानिक विकास योजनामध्ये एकात्मिक पध्दतीने गुंतवून घ्यावे लागतील. या कार्यक्रमांच्या कार्यवाहीसाठी आवश्यक ते निधी संबंधित स्थानिक संस्थांना विनानिर्बंध किंवा किमान मार्गदर्शन व निर्बंध या पध्दतीने उपलब्ध करुन द्यावे लागतील.

या ठिकाणी आणखी एका मुद्याचा खुलेपणाने विचार करणे आवश्यक आहे. रोजगार हक्क घटनेच्या मूलभूत हक्कामध्ये समाविष्ट करण्यामुळे शासकीय तिजोरीवर असहाय्य बोजा पडणार आहे व तो सरकारच्या कुवतीबाहेरचा ठरण्याची शक्यता आहे असाही एक विचार मांडला जातो. सध्याच्या सार्वजनिक खर्च कमी करण्याच्या स्वीकृत धोरणामुळे हा मुद्दा फार सहजपणे फुगविता येईल व रोजगाराचा हक्क मूलभूत हक्कामध्ये समाविष्ट करु नये असे आग्रहपूर्वक मांडले जाईल. या बाबतीत खालील मुद्दे स्पष्टपणे मांडणे आवश्यक आहे.

१) बेरोजगारी नष्ट करणे हे फक्त आर्थिक उद्दिष्ट नसून त्यात सामाजिक व राजकीय उद्दिष्टांचाहि समावेश होतो. कल्याणकारी शासन पूर्ण रोजगाराचे उद्दिष्ट नाकारु शकत नाही. आजार फार गंभीर आहे म्हणून तिकडे दुर्लक्ष करा असे म्हणण्यासारखेच हे होईल.

२) रोजगार हमी योजनेव्दारा ( रोजगार हक्क कार्यवाहीत आणण्यासाठी ) बेरोजगारांना जो रोजगार दिला जाईल तो शक्यतो उत्पादक असेल, सामाजिक / आर्थिक परिसेदा निर्माण करणारा असेल. म्हणजेच त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या उत्पादकतेत निश्चित वाढ होणार आहे. त्यातून सरकारला वाढीव महसूल मिळू शकेल. एवढेच नव्हे तर रोजगार हमी योजनेवरचा खर्च हा एका अर्थाने अनेक वस्तू व सेवांसाठी मागणी वाढविणारा असणार आहे. परिणामतः एकूण, अर्थव्यवस्थेला त्यामुळे अधिक गतिमानता येवू शकेल. रोजगार हमी योजनेखाली धरणे, रस्ते, शाळा व दवाखान्यांच्या इमारती, पाझर तलाव, वनिकरण व पडिक जमिनीची मशागत हे कार्यक्रम राबविल्यास अर्थव्यवस्थेची वाढणारी उत्पादकता कदाचित रोजगार हमीसाठी कराव्या लागणाऱ्या खर्चापेक्षा जास्त असेल. बेरोजगारी भत्त्याचा खर्च लक्षात घेता रोजगार निर्मिती करण्यासाठी करावा लागणारा खर्चच सामाजिक दृष्ट्या अधिक योग्य ठरणार आहे.

प्रत्येक गरजू व्यक्तीला खास रोजगार कार्यक्रमाच्या माध्यमातून रोजगार हमी देणे आवश्यक असले तरी शैक्षणिक पात्रता, निवड आणि प्राधान्य या गोष्टी लक्षात घेवून त्याला पाहिजे ते किंवा त्यांना योग्य ते काम देता येईलच

हे शक्य नाही. म्हणूनच रोजगाराच्या हक्काचा घटनेच्या मूलभूत हक्कामध्ये समावेश करतानाच त्याच्या मर्यादा सांगणाऱ्या अटींचे स्पष्टीकरण करणारा कायदा करण्याचीहि गरज आहे. त्या दृष्टीने महाराष्ट्रातील रोजगार हमी योजना कार्यक्रमाचा अनुभव लक्षात घेता अशा कायद्यामध्ये पुढील गोष्टी स्पष्ट करणे आवश्यक ठरते.

१) **पात्रता** : १८ वर्षापेक्षा मोठी व ६० वर्षापर्यंतची प्रत्येक व्यक्ती रोजगार हमीला पात्र असेल. काही लोकांच्यामते वयाची वरची अट असू नये असेहि सुचविले जाते. परंतु वयाच्या साठी नंतर नागरीकांना सामाजिक सुरक्षिततेची व्यवस्था असावी. त्यांना रोजगार हमीचा हक्क देणे म्हणजे म्हातारपणी त्यांच्यावर रोजगार लादणे असा अर्थ होईल.

२) **कामाचे स्वरुप** : नियोजन मंडळाच्या विचाराप्रमाणे रोजगार हमीखाली दिले जाणारे काम मूलतः शारिरीक कष्टाचे, अकुशल स्वरुपाचे असेल व त्याबाबतीत व्यक्तीला निवडीचा हक्क असणार नाही. असे केल्यामुळे साहजिकच खऱ्या अर्थाने गरजू आणि गरीब व्यक्तीच अशा रोजगाराला येतील व त्यांची सोय प्रथम होणे आवश्यक आहे. अर्थात कुशल आणि तांत्रिक स्वरुपाचे रोजगार निर्माण करणे देखील आवश्यक आहे. त्यादृष्टीने अधिक सखोल विचार करण्याची गरज आहे. उपलब्ध साधन सामुग्रीतून जास्तीत जास्त रोजगार निर्मिती करण्यासाठी अशाच स्वरुपाचे कार्यक्रम निवडावे लागतील की ज्यामध्ये वेतन- वस्तू गुणोत्तर मोठे असेल. Wage - material ratio)

३) **कामाची जागा** : याबाबतीत मात्र नियोजन मंडळाने सुचविलेली कल्पना थोडीशी अडचणीची वाटते. नियोजन मंडळाच्या मते रोजगार हमी योजनेखाली ज्या स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत कार्यक्रम राबवला जाणार आहे तिच्या कायदेशीर भौगोलिक मर्यादेतच लोकांना काम मिळाले पाहीजे. या गोष्टीबद्दल अधिक विचार करण्याची गरज वाटते. कारण सर्व स्थानिक बेरोजगारांना स्थानिक रोजगार देता येईल अशी परिस्थिती सर्व स्थानिक प्रदेशात असू शकेल याची खात्री देता येत नाही.

४) **वेतन** : या योजनेखाली कामगारांना दिले जाणारे वेतन १९४८ च्या किमान वेतन कायद्याप्रमाणे त्या त्या राज्यातील अथवा भागातील शेतमजूर अथवा अकुशल कामगारांना दिल्या जाणाऱ्या किमान वेतनाइतके असेल.

५) **नुकसान भरपाई** : जर एखाद्या व्यक्तीला हमीप्रमाणे रोजगार उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही तर अशा बेकार व्यक्तीस नुकसान भरपाई म्हणून किमान वेतनाच्या एक तृतियांश किंवा किमान रु. ५/ यापैकी जी रक्कम जास्त असेल तितकी नुकसान भरपाई दिली पाहिजे. महापूर, भूकंप, वादळ अशा मानवी नियंत्रणाच्या पलिकडील संकटाच्या परिस्थितीत अशी नुकसान

भरपाई देण्याची बंधने शासनावर असणार नाहीत.

**आवेदन व कामाची पूर्तता :** रोजगार हमी योजनेखाली रोजगाराचा हक्क प्राप्त होण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला संबंधित अधिकाऱ्याकडे आपले नाव नोंदवावे लागेल. अशा व्यक्तीला, नियोजन मंडळाच्या म्हणण्याप्रमाणे तीस दिवसाच्या आत काम दिले पाहिजे व संबंधित व्यक्तीने किमान २५ दिवस सतत असे काम केले पाहिजे. सलग २५ दिवस काम न मिळणाऱ्या व्यक्तीस रोजगार हमीचा हक्क व बेरोजगारीच्या परिस्थितीत नुकसान भरपाई हक्क काही विशिष्ट काळासाठी नाकारता येवू शकेल. याबाबतीत अधिक सखोल विचार करण्याची व लोकमताचा अंदाज घेण्याची गरज आहे.

**७) कायदा आणि प्रशासकीय कार्यवाही व्यवस्था :**

रोजगार हमीची योजना मूलतः राज्यसरकारची जबाबदारी असेल. त्यासाठी आवश्यक तो कायदा प्रत्येक राज्याने करावा. अर्थात सर्व राज्यांचे एकमत झाल्यास केंद्र सरकारने लवचिक असा दिशादर्शक कायदा करणे अधिक सोयीचे ठरु शकते. रोजगार हमी कामाची स्थानिक पातळीवर देखरेख करण्यासाठी शासकीय व बिगर शासकीय सभासदांची समिती असावी व अशा कामाचे सातत्यपूर्ण ऑडीट करण्याची व्यवस्था केली जावी.

**काही धोरणात्मक प्रश्न :**

रोजगाराच्या घटनात्मक हक्काला व्यावहारीक परिपूर्णता देण्याच्या दृष्टीने काही महत्वाचे धोरणात्मक प्रश्न निर्माण होतात. ते पुढीलप्रमाणे.

**१) रोजगार हमीच्या कार्यक्रमाची निवहक कार्यवाही :**

संघटनात्मक व विधीच्या मर्यादा लक्षात घेता रोजगार हमीची योजना टप्प्याटप्प्याने वाढवावी लागेल. अर्थात सध्याचे ग्रामीण आणि शहरी रोजगार प्रकल्प आवश्यक तर थोडेसे सुधारुन चालू ठेवावे लागतील. आर्थिक मागासलेपणा, दारिद्र्याचे अतिरिक्त प्रमाण आणि बेरोजगारीचे मोठे प्रमाण यासारखे निकष लक्षात घेवून काही विशिष्ट भागच रोजगार हमी योजनेसाठी निवडले जावेत. अर्थात त्याबाबतीत कोणत्या कायदेशीर अडचणी येतील यांचाहि विचार करावा लागेल.

**रोजगार हमी योजनेची वित्तीय व्यवस्था :**

रोजगार हमी योजनेच्या कार्यवाहीसाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांनी वित्तीय भार कसा सोसावा हा एक महत्वाचा प्रश्न ठरतो. त्याबाबतीत सध्याच्या जवाहर रोजगार योजनेतील ८०% केंद्र सरकार आणि २०% राज्य सरकार असा एक पर्याय आहे. काहींच्या मते हा वित्तीय भार केंद्र सरकार व राज्यसरकार यांनी समसमान सोसावा असा दुसरा पर्याय आहे. तसेच किमान पाच ते दहा टक्के वित्तीय संकलन स्थानिक विशेष करांच्या स्वरुपात

केले जावे (महाराष्ट्राप्रमाणे) असाही विचार मांडला जातो.)

रोजगार हमी योजनेच्या खर्चातील केंद्र सरकारचा हिस्सा मर्यादित असावा का तो राज्य सरकारच्या खर्चाबरोबर काही विशिष्ट प्रमाणात वाढत जावा हाहि एक महत्वाचा निर्णय घेणे आवश्यक ठरते.

ज्या राज्यात अकुशल कामगारांना मिळणारे वेतनमान राष्ट्रीय सरासरी वेतनापेक्षा लक्षणीय प्रमाणात जास्त असते त्या राज्यात रोजगार हमी योजनेची व्याप्ती मर्यादीत ठेवावी लागेल व अशा राज्यांना केंद्राकडून इतरहि मदत द्यायची का नाही याचाहि निर्णय घ्यावा लागेल.

**रोजगार हमी योजनेचा वित्तीय अन्वयार्थ**

रोजगाराचा हक्क घटनेतील मूलभूत हक्कामध्ये समाविष्ट केल्यास व त्यासाठी रोजगार हमी योजना राष्ट्रीय पातळीवर राबवायची झाल्यास किती वित्तीय साधनसामुग्री लागेल याचा अंदाज नियोजन मंडळाच्या एका अभ्यास पत्रिकेत करण्यात आलेला आहे. १८ वर्षे ते ५९ वर्षे या वयोगटातील रोजगार मागणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस रोजगार देणे शासनाची जबाबदारी आहे असे मानल्यास १९९०-९१ साली किती लोक बेरोजगार असतील व त्यांना रोजगार देण्यासाठी किती खर्च करावा लागेल याचा अंदाज करण्यात आलेला आहे. त्यासाठी पुढील पध्दतीने विचार करण्यात आलेला आहे.

१) १ एप्रिल १९९० ला दैनिक स्थिती बेकारांची संख्या ठरवण्यासाठी राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण संस्थेच्या १९८७- ८८ च्या बेरोजगारी दरांचा वापर केलेला आहे व त्याबाबतीत विविध रोजगार निर्मिती योजनांकडे दुर्लक्ष करण्यात आलेले आहे.

२) या बेकारांच्या संख्येमध्ये ग्रामीण भागात १.५७% आणि शहरी भागात ४.०३% या वेगाने श्रमशक्तीची भर पडते.

३) त्याउलट ग्रामीण भागात १ टक्क्यांनी रोजगार वाढतो तर शहरी भागात ३.७५ टक्क्यांनी रोजगार वाढतो किंवा सरासरी १.७५ टक्क्यांनी रोजगार वाढतो असे गृहीत धरले आहे. वरील गृहीतांच्या आधारे १८ ते ५९ या वयोगटातील किती लोक बेकार असतील किंवा किती मनुष्य दिवस रोजगाराची मागणी केली जाईल हे शोधून काढले आहे. वरील आकड्यातून खालील कारणासाठी काही कपाती केलेल्या आहेत.

१) मॅट्रीक व त्यापेक्षा अधिक शिकलेल्या लोकांपैकी ग्रामीण भागातील ३५% बेरोजगार व शहरी भागातील ५०% बेरोजगार रोजगार हमी स्वरुपाच्या कामावर येण्यास तयार होणार नाहीत.

२) २५ दिवस सलग काम करावे लागेल या कारणासाठी काही लोक रोजगार

हमीचे काम मागणार नाहीत.

३) निकृष्ट किंवा कमी वेतन मिळणाऱ्या धंद्यातील काही कामगार रोजगार हमीच्या कामावर येण्याची इच्छा ठेवणार.

वरील गोष्टी गृहीत धरता नियोजन मंडळाच्या मताप्रमाणे १९९०-१९९१ साली शहरी भागात ७४ कोटी ६० लाख मनुष्य दिवस तर ग्रामीण भागात २०५ कोटी ९० लाख मनुष्य दिवस इतकी रोजगार निर्मिती रोजगार हमीसाठी करावी लागेल.

जवाहर रोजगार योजनेचा अनुभव लक्षात घेता एक मनुष्य दिवस काम निर्माण करण्यासाठी ३० रुपये खर्च येतो. त्यातील ५०% खर्च वेतनाचा व ५०% साधनसामुग्रीचा होता. केंद्रसरकारच्या ग्रामीण विकास खात्याने अलिकडे केलेल्या एका अंदाजाप्रमाणे हा खर्च २० रु. वेतन व २० रु. साधनसामुग्री खर्च असा गृहीत धरावा लागेल. म्हणजेच एक मनुष्य दिवस रोजगार निर्मितीसाठी १९९०-९१ मध्ये ग्रामीण भागात ४० रु. खर्च येत होता. हे लक्षात घेता. ग्रामीण भागात रोजगार हमी देण्यासाठी १९९०-९१ मध्ये रु. ८२३६ कोटी इतका खर्च आला असता.

शहरी भागात सरासरी वेतन २५ रु. आणि साधनसामुग्री खर्च ३७.५० रु. असा गृहीत धरता एक मनुष्य दिवस रोजगारासाठी १९९०-९१ मध्ये ६२.५० रु. असा खर्च येत होता. म्हणजेच त्यावर्षी शहरी रोजगार हमी साठी ४६६३ कोटी रुपये इतका खर्च आला असता. अशा खर्चामध्ये दरवर्षी रोजगार वृध्दीच्या दराने वाढ होते असे मानल्यास नियोजन मंडळाच्या गणिताप्रमाणे रोजगार हमी यशस्वी करण्यासाठी १९९०-९१ च्या किंमती गृहीत धरता , ६५००० कोटी रुपये खर्च करावे लागतील. संपूर्ण बेरोजगार लोकसंख्या लक्षात घेता हा खर्च याच्या दुपटी- तिपटीने अधिक होण्याची शक्यता आहे. यावरुनच सध्याच्या परिस्थितीत रोजगाराचा हक्क घटनेच्या मूलभूत हक्कामध्ये समाविष्ट करणे सरकारच्या दृष्टीने किंवा एकूण अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने शिवधनुष्य ठरण्याची शक्यता आहे असे वाटण्यासारखीच गंभीर परिस्थिती स्पष्ट होते. परंतु सध्याचे राष्ट्रीय उत्पन्न ६ लाख कोटी रुपये आहे हे लक्षात घेता रोजगार हमीसाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या १० ते १२% रक्कम खर्च करणे अपरिहार्य आहे असा आर्थिक निर्णय घेणे राजकीय दृष्ट्या अडचणीचे ठरणार नाही. १९९१-९२ च्या भारतसरकारचा (केंद्र, राज्ये, केंद्रशासित प्रदेश) यांचा एकूण (महसूली/ भांडवली) खर्च रु. १७६०१९ कोटी इतकाच होता. वर्षाला रोजगार हमी साठी १२००० कोटी रुपये लागतात असे म्हटले तर हा खर्च अर्थसंकल्पीय खर्चाच्या फक्त ६.८१% इतकाच होता. वेगळ्या पध्दतीने असेही म्हणता

येईल की भारत सरकारच्या १९९१-९२ च्या एकूण करमहसूलाचा (रु. १०२८९६ कोटी) फक्त १२% भाग रोजगार हमी योजनेसाठी राखीव ठेवला (earmanking) तरी हा प्रश्न सुटू शकतो.

या सर्व परिस्थितीचा विचार करता प्रा. वि. म. दांडेकर यांनी रोजगार हमीचा हा प्रश्न अधिक कार्यक्षमतेने सोडविण्याच्या दृष्टीने कामगारांच्या दोन प्रकारच्या संघटना सूचित केल्या आहेत

१) कामगारांच्या सहकारी संस्था : अशा कामगार सहकारी संस्थानी जिल्ह्याच्या क्षेत्रात कंत्राटी पध्दतीने काम घ्यावे असे त्यांनी सुचविले आहे. पहिल्या योजनेमध्ये सुचविण्यात आलेला भूसेनेचा विचार दांडेकरांनी पुन्हा आग्रहाने मांडलेला दिसतो. अर्थात भूसेनेचा विचार आणखी सखोल पध्दतीने तपासून पाहण्याची आवश्यकता आहे. कारण त्यामध्ये कामगारांच्या मोठ्या प्रमाणातील स्थलांतराचा प्रश्न निर्माण होतो.

डॉ. वि. म. दांडेकर यांच्या विचारांच्या अनुरोधाने विचार करता, आजपर्यंतचा अनुभव लक्षात घेता "रोजगाराचा घटनात्मक हक्क काम न करण्याचा कायदेशीर हक्क होण्याचा धोका आहे. असा हक्क राष्ट्राच्या विनाशाची नांदी ठरेल. ते टाळायचे तर रोजगाराचा हक्क न्यायालयाच्या कक्षेतून कटाक्षाने बाहेर ठेवला पाहिजे. आर्थिक विकास साधणारा रोजगार कायद्याने प्रस्थापित होत नाही आणि न्यायालयातून मिळवता येत नाही. त्यासाठी शासनसंस्थेकडे काही आर्थिक आणि संघटनात्मक क्षमता असावी लागते. तिने आपल्या मर्यादेतच जबाबदारी स्वीकारली पाहीजे. लोकप्रिय निवडणूक जाहीरनामे अथवा भंपक शब्दावलीचे मानवी हक्काचे जाहीरनामे यास बळी पडता कामा नये."

या ठिकाणी सर्वांनी एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे की घटनेने दिलेल्या इतर मूलभूत हक्कांच्या बाबतीत अतिक्रमण होण्याची शक्यता मर्यादित असते आणि तशा परिस्थितीत राजकीय हस्तक्षेपाने असे मूलभूत हक्क संबंधितांच्यासाठी सुरक्षित करता येतात व त्यासाठी ज्यांना झगडावे लागते त्यांच्याकडे आर्थिक कुवत असते व अशी माणसे बहुतेक उच्चभ्रू समाजातील असतात. अशांची संख्यादेखील फारच मर्यादीत असते. या दृष्टीने विचार करता रोजगाराचा हक्क गुणात्मक दृष्ट्या पूर्णता भिन्न आहे. कारण ज्यांना बेरोजगारीचे संकट सोसावे लागते, ते बहुधा कनिष्ट स्तरावरील असतात. आर्थिक दृष्ट्या दुर्बल किंवा अक्षम असतात व दुर्दैवाने त्यांची संख्या मोठी असते; हे लक्षात घेता डॉ. एम. के. खनिजो (नियोजन मंडळाचे सल्लागार) यांचे पुढील विधान सर्वांनी गांभियनि लक्षात घेणे आवश्यक आहे.

"The country has a democratic political base with arithmetical equity

of political rights, that is, one person one vote. Can it afford for too long to tell its unemployed that a provision for work will be made for them some day, Somehow or the other, and then expert that its political system can continue smoothly? The need for the Right to Work is hardly negotiable. Its implemenlation mechanism can be debated so that an efficient and equitable omplem entation system is evolved." म्हणजेच रोजगाराचा हक्क मूलभूत हक्कामध्ये समाविष्ट करण्याचा निर्णय आता लांबविता येणार नाही. ती आता एक अटळ बाब आहे. तसे न केल्यास या देशाची समाजव्यवस्था विघटित होण्याचा धोका आहे. त्यातून राजकीय अनागोंदी व राष्ट्र विनाश हीच फलिते संभाव्य आहेत.

**निवडक संदर्भ साहित्य :**


1. R. Datt, K.P.M. Sundharam - Indian Economy 26th Revised Edition, 1989

२. वि. स. पागे. - बेकारी निर्मूलनातून ग्रामविकास, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई प्रकाशन १९८९.

3. D. Kukin - Lenin's Plan of Building Socialism in the USSR. Progress Publishers. Moscow. 1914.

4. V. Karpinsky - The Social And StateStructure of The USSR. Foreign Languages Publishing House Moscow 1952.

५. वि. म. दांडेकर - पूर्ण रोजगार नवीन नियोजन आयोगाचा दृष्टीकोन, अर्थसंवाद जानेवारी - मार्च १९९१. (खंड १४, अंक ४)

6. Pravin Visaria, B.S. Minhas - Evolving an Employment Policy for the 1990's - **Economic and Political Weekly.** 13th April, 1991. (Vol. 26, No. 15)

7. Facts for you - Annual 1991 - 92

8. Seminar - Right to work, - July 1988. (Issue no. 347)

**9. Quarterly Economic Report of The Indian Institute of Public opinion** - Issue No. 131, July - sept. 1990


★★★

# दि. कोल्हापूर मराठा को- ऑप. बँक लि., कोल्हापूर

प्रधान कार्यालय : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

• वैशिष्टे •

• अखंड १२ तास सेवा. •
• देशांतील प्रमुख शहरावरील ड्राफ्ट त्वरीत मिळण्याची सोय •
• **हिरक महोत्सवी वर्षात पदार्पण** •

---

**• सांपत्तिक स्थिती •**

■ ठेवी : २५ कोटी ०१ लक्ष ■ कर्जे : १८ कोटी १० लक्ष ■
■ खेळते भांडवल : २९ कोटी ७८ लक्ष ■ सभासद : ३०७४७ ■

■ **शहराच्या विविध भागांत ९ शाखा आपल्या सेवेसाठी तत्पर** ■

| | | |
|---|---|---|
| **व्ही. बी. साळोखे** | **ॲड. मदन भोसले** | **पी. बी. पोवार** |
| व्यवस्थापक | उपाध्यक्ष | अध्यक्ष |

**आणि संचालक मंडळ**

---

# SUTANTU SIZERS PRIVATE LTD.,

WORKS : 79,Station Road, ICHALKARANJI 416 115
PHONE : 20282 / 23436
REGD.OFFICE : Mane Building, Shri G. B. Marathe Road,
MIRAJ 416 610 PHONE : 2398
BOMBAY OFFICE : 79, Nariman Bhavan, 7th Foor,
79, Nariman Point, BOMBAY 400021

**Leading in Southern Maharashtra for best quality sizing of cotton spun and polyster yarn on high speed sizing machines**

शास्त्रीय समाजवादाच्या खुल्या ज्ञानपीठास

हार्दिक शुभेच्छा

# श्री छत्रपती शाहू सहकारी साखर कारखाना लि., कागल

ता. कागल जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| **एफ्. आर. शहा** | **खंडेराव शं. नाडगोंडे** | **विक्रमसिंह ज. घाटगे** |
| कार्यकारी संचालक | व्हा. चेअरमन | चेअरमन |